cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२९१ | गुरूवार, दि.१३ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### अमेरिकेपुढे लोटांगण...!

ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यापासून त्यांनी जे जे आदेश दिले ते भारताने आपली आधीची भूमिका बदलून निमूटपणे मान्य केल्याचे गेले काही दिवस सतत दिसत आहे. ट्रम्प यांनी ब्रिक्स देशाच्या संघटनेला पहिला इशारा दिला होता की, डॉलरला पर्याय म्हणून दुसरे किंवा स्वदेशी चलन वापरण्याचा प्रयत्न झाला तर त्या देशांवर जबरी आयात कर लावला जाईल. भारताने तातडीने डॉलरला दुसरा पर्याय शोधला जाणार नाही आणि डॉलरच्या चलनातच व्यापार केला जाईल अशी निःसंदिग्ध ग्वाही दिली. त्यानंतर अमेरिकेने रशियातील तेलवाहू जहाजे आणि तेल कंपन्यांवर निर्बंध लागू केले, भारताने ते तातडीने विनासायास मान्य केले.

# शेतकऱ्यांच्या अर्धनग्न आंदोलनात पोलिसांचा खोडा

## मुंबईकडे निघालेल्या हिंगोलीच्या शेतकऱ्यांना कर्जत जवळ अडवले

**मुंबई । प्रतिनिधी**

**सरसकट कर्जमाफी, पीक विमा, रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावी यासाठी हिंगोली जिल्ह्यातील जवळपास ४० शेतकरी मंगळवारी (दि.११) हिंगोलीच्या जिल्हाधिकारी कार्यालयापासून मुंबईकडे निघाले होते. हिंगोली जिल्ह्यातून अर्धनग्न आंदोलन करत मंत्रालयाकडे जात असलेल्या शेतकऱ्यांना रायगड कर्जत येथे बुधवारी (दि.१२) मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**






११ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता नामदेव पतंगे व इतर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन केले. यानंतर दुपारी चार वाजता सर्व शेतकरी मुंबईकडे रवाना झाले. या सर्व आंदोलक शेतकऱ्यांना कर्जत (जि. रायगड) येथे पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले. पुढील आदेश येईपर्यंत आपण मुंबईला जाऊ नका, असे पोलिसांनी सांगितले. परंतु जोपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी होत नाही. तोपर्यंत आमचे हे आंदोलन सुरूच राहणार आहे, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. आंदोलक शेतकरी नामदेव पतंगे यांनी दिलेल्या माहितीनुसार,पोलिसांनी आम्हाला थांबून घेतले असले तरी आम्ही घाबरणार नाहीत. आमचे आंदोलन यापुढेही सुरूच राहील, हिंगोली पासून मुंबईकडे निघालेले आंदोलक शेतकऱ्यांच्या मागावर गोरेगाव पोलीसही आहेत. जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मागण्या घेवून सरकारकडे जाणे गुन्हा आहे का? आमच्याकडे कुठले शस्त्र नाही, अंगावर पूर्ण कपडे नाहीत. लोकशाही पद्धतीने आंदोलन सुरू असताना पोलिसांनी मागावर राहत ताब्यात घेऊन आंदोलन मोडीत काढण्याचे प्रकार होत असतील तर हे चुकीचे आहे, असे आंदोलक शेतकरी म्हणाले.

### तर मोठे आंदोलन करावे लागेल

सरसकट कर्ज माफी, पीक विमा, सोयाबीन कापसाला अनुदान, वन्य प्राण्याचा बंदोबस्त, पीक विम्यासाठी सिबिलची अट रद्द करा, या सह इतर प्रमुख मागण्यांसाठी हे शेतकरी मंत्रालयावर चालत निघाले असून, सरकारने याबाबत गंभीर दखल घेऊन मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आम्हाला यापेक्षा मोठे आंदोलन करावे लागेल असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

## गेल्या पाच वर्षांत डीपीडीसीतून दिलेल्या कामांची तपासणी करा

# आ.धस आज घेणार पालकमंत्री अजित पवार यांची भेट

## २०१९ ते २०२२-२३ मध्ये सर्वाधिक भ्रष्टाचार झाला असल्याचा दावा



**बीड । प्रतिनिधी**

**परळीतील महादेव मुंडे हत्याप्रकरण आणि डीपीडीसीतील घोटाळा प्रकरणावरुन सुरेश धस आक्रमक झाले आहेत. याप्रकरणी, आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन गेल्या ५ वर्षातील डीपीडीसीतील कामांची चौकशीची मागणी करणार असल्याचे आमदार धस यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अजित पवारांची भेट घेतल्यानंतर आमदार धस यांनी** प्रतिक्रिया दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बीडचे कलेक्टर अविनाश पाठक यांनी भेट घेतली. यासंदर्भात धस यांना प्रश्न विचारला असता, नियोजन विभागाने

पान २ वर

### ८२ दिवसांनी गुन्हा दाखल

परळी विधानसभा निवडणुकांवेळी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या पोलीस गार्डसमोरच माधव जाधव यांना मारहाण करण्यात आली होती. हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. मात्र, या संदर्भात परळी पोलिसांनी साधा गुन्हा सुद्धा नोंदवून घेतला नव्हता. आता ८२ दिवसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे, त्यावरही धस यांनी प्रतिक्रिया दिली. मतदान दिवशीच्या मारहाणप्रकरणी ८२ दिवसांनी पोलीस अधीक्षकांनी गुन्हा दाखल केला आहे. राजेसाहेब देशमुख, त्यांचा बॉडीगार्ड आणि माधव जाधव यांना कशी वागणूक देण्यात आली हे राज्याने पाहिले आहे. कलेक्टर यांनी तात्काळ गुन्हा दाखल करायला हवा होता. मात्र, त्यांनी तसे केले नाही. परळी मधील ३३० पैकी २०० बुथ ताब्यात होते हे सिद्ध होते, असेही धस यांनी म्हटले.

### मुंडे हत्याप्रकरणात आकाचा संबंध

महादेव मुंडे यांच्या पत्नी उपोषणाला बसल्या तर बीड एसपी साहेब ही बाब आमच्यासाठी लज्जास्पद आहे. त्या महिलेचा पती जाऊन १६ महिने झाले आहेत. याप्रकरणाचा तपास डीवायएसपींकडे दिल्यानंतर परळीतील १२ ते १५ लोक गायब आहेत. एसपी, एलसीबी आणि डीवायएसपी यांनी या आरोपींना जेलमध्ये घालावे, अशी मागणीही धस यांनी केली. तसेच, या प्रकरणात आकाचा संबंध आहे. आकाच्या मुलाचे बॉडीगार्ड म्हणून फिरणारेच महादेव मुंडे प्रकरणाचे आरोपी आहेत. या सगळ्या आरोपीच्या नावाची यादी मी एसपींना दिली आहे. कुणाचे सीडीआर चेक करायाला हवेत तेदेखील त्यांना सांगितले आहे, असे धस यांनी म्हटले.

### धस यांनी केलेल्या आरोपांची अजित दादांकडून पडताळणी

बीड जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून जिल्हा नियोजन समितीच्या कामात भ्रष्टाचार झाला आहे, असा आरोप सुरेश धस यांनी केला होता. या आरोपांची चौकशी करण्यासाठी अजित पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. त्याची कागदपत्रे घेऊन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अजित पवार यांनी मंत्रालयात बोलावले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अजित पवार यांची भेट घेतली.

## ५० लाख सदस्यांसाठी चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण महाराष्ट्र दौऱ्यावर




**मुंबई । प्रतिनिधी**

**संघटन पर्वाअंतर्गत महाराष्ट्र भाजपाने १ कोटी सदस्य नोंदणीचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. येत्या १५ दिवसांत आणखी ५० लाख सदस्य नोंदवून दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य साध्य केले जाईल, असा विश्वास भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी व्यक्त करत यासाठी आपण १३ फेब्रुवारीपासून कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासमवेत राज्याचा दौरा करणार असल्याचे सांगितले.**

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आदी उपस्थित होते. १ कोटींचा टप्पा भारतीय जनता पार्टीच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे, जनतेच्या आशीर्वादामुळे गाठू शकलो असेही बावनकुळे यांनी नमूद केले. पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, भाजपा सदस्य नोंदणी अभियानामध्ये पंचायत ते पार्लमेंट स्तरावरचे सर्व लोकप्रतिनिधी, बूथ अध्यक्ष ते प्रदेशाध्यक्ष तसेच पक्ष संघटनेच्या सर्व घटकांनी सहभाग घेतला. आता पुढील १५ दिवस ७८ संघटनात्मक जिल्ह्यांमधील ७९२ मंडलांमध्ये प्रभावीपणे संघटन पर्व राबवण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक वाडी, वस्ती, पाडे, गावांपर्यंत पोहोचून सदस्य नोंदणीला वेग

पान २ वर

# सुदर्शन घुलेला १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी

## आवाजाचे नमुने तपासले जाण्याची शक्यता

**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख हत्याकांडातील संशयित आरोपी सुदर्शन घुले याला बुधवार दि.१२ रोजी केज पोलिसांनी खंडणी प्रकरणी केज न्यायालयात हजर केले असता, त्याला न्यायालयाने १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**

या बाबतची माहिती अशी की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केजचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेला संशयित आरोपी सुदर्शन घुले याला सीआयडीचे उपअधीक्षक अनिल गुजर यांनी केज न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायाधीश एस व्ही पावसकर यांच्या न्यायालयात हजर केले. यावेळी सरकारी वकील अॅड. जितेंद्र शिंदे यांनी त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडीची मागणी केली. दरम्यान न्यायमूर्ती यांनी सुदर्शन घुले याला दि. १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तो केज येथील पोलिसांच्या ताब्यात आहे. दरम्यान, सुदर्शन घुले याने २९ नोव्हेंबर रोजी आवादा कंपनीच्या मस्साजोग येथील कार्यालयात जावून प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांच्याकडे २ कोटींची खंडणी मागितली होती. त्या नंतर त्याच्या मोबाईल फोन वरून विष्णू चाटे व वाल्मीक कराड यांनी सुद्धा सुनील शिंदे याला २ कोटी न दिल्यास काम करू देणार नसल्याची धमकी दिली होती. त्यामुळे त्या तिघांचे तक्रारदाराशी झालेले संभाषण व आवाजाचा पुरावा सादर करण्यासंदर्भात सुदर्शन घुले याच्या व्हॉईस सॅम्पल (आवाजाचे नमुने) घेऊन ते फॉरेन्सिक लॅब (न्याय वैद्यक प्रयोगशाळा) कडे पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# संसदेत आज आयकर विधेयक मांडले जाणार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**संसदेत गुरुवारी, नवे आयकर विधेयक मांडले जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील पहिल्या टप्प्याचा गुरुवारी शेवटचा दिवस आहे. यामुळे हे विधेयक सादर केले जाणार आहे. या विधेयकात ६२२ पानांमध्ये ५३६ कलमे, २३ प्रकरणे आणि १६ अनुसूची असल्याचे समजते.**

विधेयकात कोणत्याही नवीन कर प्रणालीची तरतूद नाही, तर केवळ विद्यमान आयकर कायदा, १९६१ ला सुलभ करण्यासाठी हे विधेयक आणले जात आहे, असे अगोदरच सरकारने सांगितले आहे. अगोदरच्या आयकर कायद्यात २९८ कलमे आणि १४ अनुसूची आहेत. कायदा सादर केला तेव्हा त्यात ८८० पृष्ठे होती. आता मांडले जाणारे नवीन विधेयक आयकर कायदा, १९६१ ची जागा घेणार आहे. हा नवीन कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. नवीन विधेयकात फ्रिंज बेनिफिट टॅक्सशी संबंधित अनावश्यक कलमे वगळण्यात आली आहेत. सदर विधेयकात लहान वाक्ये वापरली आहेत आणि तक्ते आणि सूत्रे वापरून वाचकांना अनुकूल बनवण्यात आले आहे. टीडीएस, अनुमानित कर आकारणी, पगार आणि बुडीत कर्जासाठी कपातीशी संबंधित तरतुदींसाठी तक्ते देण्यात आले आहेत.

पान २ वर

# माघ पौर्णिमेला संगमात दीड कोटी भाविकांचे स्नान

## आतापर्यंत ४६.२५ कोटी भाविकांनी घेतली आस्थेची डुबकी

**प्रयागराज । वृत्तसंस्था**

महाकुंभमेळ्यात माघ पौर्णिमेच्या निमित्ताने बुधवारी (१२ फेब्रुवारी) संगमावर दीड कोटी भाविकांनी पवित्र स्नान केले. महाकुंभातील हे पाचवे शाही स्नान आहे. आतापर्यंत एकूण ४६.२५ कोटी भाविकांनी संगमात आस्थेची डुबकी घेतली असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



बुधवारी त्रिवेणी संगमापासून १० किमी अंतरावर सर्वत्र भाविकांची गर्दी दिसून आली. मंगळवारी सायंकाळपासूनच माघी पौर्णिमेचे स्नान शुभ मुहूर्तावर सुरू झाले होते. येथे रात्री उशिरा मोठ्या संख्येने भाविक संगमावर पोहोचले. बुधवारी सकाळी भाविकांची संख्या वाढली. हे स्नान बुधवारी संध्याकाळपर्यंत

पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २४.५० क्विंटल | २,७०० | ३,३५० | ३,०१७ |
| ज्वारी/हायब्रिड: ५४.५० क्विंटल | १,८०० | २,५०० | २,१५२ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ५१.५० क्विंटल | ६,८०० | ७,२०० | ७,०९५ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ४,१०० | ५,५०० | ४,७६६ |
| बाजरी: २.५० क्विंटल | २,३०० | २,८४० | २,६१६ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| सोयाबीन: ७.५० क्विंटल | ३,४०० | ३,४०० | ३,४०० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,७०० | ५,७०० | ५,७०० |

# सरकारच्या धोरणांमुळे परावलंबी वर्ग तयार होतोय!

## मोफत योजनांवर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**लोकांना धान्य आणि पैसे मोफत मिळत राहिले तर त्यांना काम करण्याची इच्छाच राहणार नाही. त्यांना मोफत रेशन मिळत आहे आणि कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत. हे सांगणे दुःखद आहे; पण आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामिल करता येऊ शकत नाही का ? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत. अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का, अशा शब्दांमध्ये सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या मोफत योजनांवर** बुधवारी (दि.१२) **सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले.**



शहरी भागातील बेघर लोकांना आश्रय देण्यासाठी असलेल्या योजनांना फंड देणे बंद केल्या प्रकरणी दाखल याचिकेवर न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने स्पष्ट केले की, ''अशा मोफत योजनांमुळे लोक काम करण्याचे सोडून देतात. त्यामुळे लोक परावलंबी होत आहेत. न्यायमूर्ती गवई म्हणाले की, ''हे सांगताना खूप दुखः होते की आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामिल करता येऊ शकत नाही का? ते देशाच्या विकासात

पान २ वर

### सरकारला स्पष्टीकरण देण्याचे निर्देश

सरकारच्या वतीने युक्तीवाद करताना अटॉर्नी जनरल आर. वेंकटरमाणी म्हणाले की, सरकार शहरी भागातील गरीबी मिटवण्यासाठीच्या प्रकल्पांना अंतिम रुप देत आहे. यामध्ये शहरातील बेघर लोकांना आश्रय देण्याची योजना असणार आहे. यावर या योजना कधीपर्यंत पूर्णत्वास जाणार याचे स्पष्टीकरण सरकाने द्यावे, असे निर्देश खंडपीठाने दिले. तसेच या प्रकरणी पुढील सुनावणी ६ आठवड्यानंतर होईल, असेही स्पष्ट केले.

### महाराष्ट्राचेही टोचले होते कान

१३ ऑगस्ट २०२४ रोजी, पुण्याजवळील जमीन प्रकरणातील याचिकाकर्त्यांना मोबदला द्या, नाहीतर लाडकी बहीण सारख्या योजनांवर बंदी घालण्याचे आदेश द्यावे लागतील. असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला दिला होता. या अगोदरही जमीन प्रकरणीच्या सुनावणीत सरकारला सुनावले होते. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला सवाल केला होता की, लाडकी बहिण योजनेसाठी तुमच्याकडे पैसे आहेत, मात्र याचिकाकर्त्यांना मोबदला देण्यासाठी पैसे नाहीत का? असा सवाल केला होता.

cmyk

## अग्रलेख

# अमेरिकेपुढे लोटांगण...!

ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यापासून त्यांनी जे जे आदेश दिले ते भारताने आपली आधीची भूमिका बदलून निमूटपणे मान्य केल्याचे गेले काही दिवस सतत दिसत आहे. ट्रम्प यांनी ब्रिक्स देशाच्या संघटनेला पहिला इशारा दिला होता की, डॉलरला पर्याय म्हणून दुसरे किंवा स्वदेशी चलन वापरण्याचा प्रयत्न झाला तर त्या देशांवर जबरी आयात कर लावला जाईल. भारताने तातडीने डॉलरला दुसरा पर्याय शोधला जाणार नाही आणि डॉलरच्या चलनातच व्यापार केला जाईल अशी निःसंदिग्ध ग्वाही दिली. त्यानंतर अमेरिकेने रशियातील तेलवाहू जहाजे आणि तेल कंपन्यांवर निर्बंध लागू केले, भारताने ते तातडीने विनासायास मान्य केले. वास्तविक रशियावर अमेरिकेचे निर्बंध असतानाही यापूर्वीच्या काळात भारताने रशियातून तेल आयात चालू ठेवली होती. आमच्या ऊर्जेची गरज भागवण्यासाठी आम्हाला आमच्या परीने निर्णय घ्यावे लागतात, अशी भारताची आधीची भूमिका होती. पण त्यात अमेरिकेच्या बरहुकूम बदल करण्यात आला. नुकत्याच सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या मोटरसायकली आणि याट अशा महागड्या वस्तूंच्या आयातीवर जवळपास ५० टक्के कर सवलत दिली गेली. ही काही तातडीची गरज नव्हती, पण ती केली गेली याचा अर्थ अमेरिकेच्या नवीन प्रशासनाला खूश करण्याचा यामागे हेतू असावा, असे सांगितले जात आहे.

आणखीन एक महत्त्वाची घटना दरम्यानच्या काळात घडली, त्याबद्दल भारताने अमेरिकेकडे निषेधाचा चकार शब्द काढलेला नाही. ही घटना म्हणजे शंभरहून अधिक भारतीय नागरिकांना अमेरिकेत बेकायदा वास्तव्य केल्याच्या कारणावरून हातापायात बेड्या घालून लष्करी मालवाहू विमानातून भारतात पाठवण्यात आले. वास्तविक यापूर्वीही अमेरिकेत बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना परत पाठवले गेले होते, पण त्यावेळी त्यांच्यापैकी कोणालाही हातकड्या आणि बेड्या घातलेल्या नव्हत्या. संपूर्ण देशात याविषयी तीव्र प्रतिक्रिया उमटली; पण भारत सरकारने मात्र या निर्णयावरून अमेरिकेच्या विरोधात निषेधाचा चकार शब्द काढला नाही. उलट अमेरिकेने त्यांच्या देशातील कायद्यानुसार ही कारवाई केली आहे, अशी कारवाई यापूर्वीच्या काळातही अनेक वेळा झाली आहे असेच समर्थन करताना सरकार दिसले. मात्र अन्य देशांनी अमेरिकेच्या असल्या कृतीच्या विरोधात ठाम आक्रमक भूमिका घेतल्यानंतर ट्रम्प यांचे प्रशासन नमले होते. विशेषतः कोलंबिया या देशाने अमेरिकेने लष्करी मालवाहू जहाजातून आमच्या निर्वासितांना परत पाठवले तर हे विमान आम्ही आमच्या भूमीवर उतरू देणार नाही, आमच्या देशाच्या नागरिकांना आम्ही आमच्या विमानातून सन्मानाने परत घेऊन येऊ अशी भूमिका घेतल्यानंतर अमेरिकेने कोलंबियाला तशी परवानगी दिली. पण मग त्यावेळी भारत सरकारने अशी भूमिका का घेतली नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला, त्यालाही सरकारकडून उत्तर मिळालेले नाही. अजून सुमारे ९३ हजार भारतीय नागरिकांना मायदेशी पाठवले जाणार आहे. त्यांच्या बाबतीत तरी भारत सरकार अशी स्वतः विमान पाठवण्याची सुविधा उपलब्ध करून देणार आहे काय, याचाही उलगडा झाला नाही.

ट्रम्प सत्तेवर आल्यापासून भारताने अमेरिकेपुढे सतत अशी नमती भूमिका का घेतली यावर आता चर्चा सुरू झाली आहे. आपल्या सगळ्यांना माहिती आहे की लाचखोरीच्या आरोपावरून उद्योगपती अदानी यांच्यावर अमेरिकेत अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. त्यामुळे अदानी यांना वाचवण्यासाठीच भारत सरकार ही नरमाईची भूमिका घेत असल्याचा आरोप अनेक जण करीत आहेत. कारण काहीही असले तरी भारताची अमेरिकेच्या बाबतीतली ही लेचीपेची भूमिका आश्चर्यकारक आहे.

सरकार दावा करते त्याप्रमाणे भारत आज जर खरेच जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असेल तर अमेरिकेलाच भारताची अधिक गरज वाटायला हवी. आज अमेरिकेची अर्थव्यवस्था फार मजबूत स्थितीत नाही, ही बाब लपून राहिलेली नाही. या पार्श्वभूमीवर भारतासारखे मोठे मार्केट आपल्या हातून जाऊ नये म्हणून अमेरिकाच भारताशी सलगी करून राहणे अपेक्षित असताना भारताने मात्र नेमकी उलटी भूमिका घेतलेली दिसते. ट्रम्प प्रशासन पहिल्या दिवसापासून भारताच्या बाबतीत आक्रमक भूमिका घेताना दिसते आहे.

पन्नू नावाच्या एका खलिस्तानवादी नेत्याला ट्रम्प यांनी त्यांच्या शपथविधीचे निमंत्रण दिले होते. या शपथविधीच्या कार्यक्रमाला पन्नू उपस्थित होता आणि त्यांनी तेथे खलिस्तान जिंदाबादच्या घोषणा दिल्या होत्या. त्यावरून भारताने निषेध का नोंदवला नाही, पन्नूला आमच्या ताब्यात द्या अशी मागणी का केली नाही, असेही प्रश्न उपस्थित होत आहेत. पण भारत सरकारने त्यावरूनही निषेधाचा चकार शब्द काढलेला नाही. ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर त्यांच्यापुढे अशी शरणागत भूमिका भारताने घेतल्याने त्याचे अनेकांना आश्चर्य वाटल्याखेरीज राहिलेले नाही.

# प्रयागराज महाकुंभमेळ्याला आष्टीच्या पत्रकारांची उपस्थिती व गंगास्नान

## धार्मिक,ऐतिहासिक स्थळ पाहणीने संशोधनाला संधी



**आष्टी । प्रतिनिधी**

सनात वैदिक प्राचीन प्रथेप्रमाणे कुंभमेळा हा उत्सव महत्त्वपूर्ण असून या वर्षीचा हा महाकुंभमेळा १४४ वर्षानंतर आलेला आहे.त्यामुळे या महाकुंभाला अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे या पर्व काळामध्ये पवित्र गंगा स्नान करण्याचे निश्चित करून आष्टीच्या पत्रकार संघाने प्रयागराज दौरा आयोजित केला.गंगा,यमुना आणि लुप्त असलेल्या सरस्वतीच्या त्रिवेणी संगमावर सर्व पत्रकारांनी पवित्र गंगा स्नान केले.यावेळी संपुर्ण भारत विविध राज्यातील विविध पारंपारिक वेशभूषांमध्ये अनेक राज्यातील भाविक भक्त उपस्थित होते.या अभूतपूर्व जनसमुदायाला उपस्थितीमुळे या पवित्रक्षेत्री मोठ्या प्रमाणावर भाविकांची अध्यात्मिक ओढ दिसून आली.त्यामध्ये वयोवृद्ध मध्यम आणि विशेषतः महाविद्यालयीन तरुण तरुणींची ही लक्षणीय संख्या दिसून आली.१४४ वर्षानंतर आलेल्या या अपूर्व योगावर पुण्य प्राप्ती करून घेण्यासाठी या पिढीतील सर्वांचीच धडपड दिसून आली. कारण आपल्या या पिढीला पुन्हा ही संधी निर्माण होणार नसल्याने भाविकांनी गर्दी केली आहे.धर्माचा राजमुकुट, पुण्यभूमी प्रयाग राज येथील या त्रिवेणी संगमाच्या परिसरात खाजगी वाहनांना बंदी असल्यामुळे भाविकांना सुमारे १० किलोमीटर अंतर चालावे लागत आहे.सर्व वयोगटातील भाविक भक्त कोणतीही तक्रार न करता केवळ गंगास्नानासाठी आतुर झालेले दिसून येत होते. प्रयागराज येथील विविध आखाड्यांमधील पदाधिकारी आणि त्यांचे भक्तगण अध्यात्मिक वातावरणात लीन होऊन गेलेले दिसून येत होते. विशेषतः हिमालय पर्वतराजीत वास्तव्यास असणाऱ्या नागा साधूंचे दर्शन घेण्याचाही योग आष्टीच्या पत्रकारांना आला.हे सर्व साधू आपापल्या ब्रह्मानंदी अवस्थेत दिसून आले.त्यांचेही आशीर्वाद या निमित्ताने घेता आले.या महाकुंभासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची आणि प्रशासनाची सर्व भाविक भक्तांची व्यवस्था करताना कसोटी लागलेली दिसून येत होती.

### धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळ पाहणीमुळे संशोधनाला संधी


महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी आहे; किंबहुना हिंदुस्थानच्या विविध राज्यांमध्येही धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांची फार मोठी उपलब्धता असून या स्थळांना आवर्जून भेट देण्याचा योग आष्टी तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांना सहल प्रसंगी येत आहे. यातून संशोधनाची मोठी संधी प्राप्त झाल्याचे सहल दरम्यान माध्यमांशी बोलताना पत्रकार उत्तम बोडखे म्हणाले. गंगा यमुना आणि गुप्त सरस्वती अशा देशातील अत्यंत महत्त्वाच्या तीन नद्यांच्या त्रिवेणी संगमावर आज रविवारी पवित्र शाही स्नान या सर्व पत्रकार सदस्यांनी आज येथे केले. यावेळी येथील रहिवासी आणि अध्यात्मक क्षेत्रातील बांधवांकडून या भूमीचे महत्त्व माहीत करून घेतले.अध्यात्मक क्षेत्रामध्ये समता बंधुत्व ऐक्य सर्वोच्च धर्मसमूह आणि शांतीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या अनुषंगाने प्रयागराज चा पत्रकारांचा दौरा अत्यंत फलदायी असल्याचे सांगून ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्लभाऊ सहस्त्रबुद्धे म्हणाले की,तिर्थराज प्रयाग राज हा प्रत्येकाने जाणून घेण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय असून मानवी जीवनासाठी तो एक अमूल्य ठेवा आहे.दरम्यान,आज या पवित्र शाही स्नानानंतर हे पत्रकार बांधव उज्जैन,जय महाकाल येथे रवाना होत आहेत.या ऐतिहासिक आणि धार्मिक सहल प्रवासामध्ये ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, उत्तम बोडखे,दत्ताभाऊ काकडे, प्रवीण पोकळे,विनोद ढोबळे, भीमराव गुरव,शरद तळेकर, शरद रेडेकर,रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी,संतोष सानप, सचिन रानडे,मनोज पोकळे आदीसह पदाधिकारी आणि सदस्य पत्रकार बांधव तिर्थक्षेत्र यात्रेत सहभागी आहेत.

# कोणत्या पदाचा झेंडा घेऊ हाती..

## वडगाव गुंधा येथील सचिनचा एमपीएससी परीक्षेत डबल धमाका; कर सहाय्यक व महसूल सहाय्यक म्हणुन निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून.या परीक्षेमध्ये वडगाव गुंदा ता.जि.बीड या गावातील सुपुत्राने एमपीसी या परीक्षेमध्ये कठोर मेहनत, चिकाटी,परिश्रम आणि त्या मध्ये सातत्य ठेवत.अनेक अपयश पचवत त्या अपयशांच्या पायऱ्यांचा जिना बनवत अखेर..!महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये एकाच वेळेस ''कर सहाय्यक आणि महसूल सहाय्यक'' या दोन पदावर आपल्या परिश्रमाची, कष्टाची आणि सातत्य ची मोहर उमटवत. अनेक दिवसापासून व वर्षापासून लोकांच्या बांधाला जाऊन मोलमजुरी करत. दैनंदिन खर्च भागवत काटकसर करून(आईने आणि मामाने) प्रत्येक महिन्याला आपल्या मुलाला शिक्षणासाठी पैसा कमी पडू दिला नाही.याची जाणीव ठेवत सचिन चंद्रकांत नागरगोजे या वडगाव गुंधा येथील सुपुत्राने



आपल्या आईच्या कष्टाची,परिश्रमाची जाणीव ठेवत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये एकाच वेळी कर सहाय्यक आणि महसूल सहाय्यक या दोन पदावर आपल्या परिश्रमाची आणि आईच्या कष्टाची मोहर उमठवत घवघवीत सह्याद्री सारख्या मोठ्या यशाला गवसणी घालून.आईला सचिन विचारतो आहे सांग ना आई कोणत्या पदाचा झेंडा हाती धरू...!अशा प्रकारचा दुर्मिळ योग आपल्या आईचे कष्ट,परिश्रम याची जाणीव ठेवत सचिनने घडवून आणला आहे .आईच्या चरणी हे यश सचिन अर्पण केली असून सचिनने आमच्या दैनिक लोकाशाच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, या यशामध्ये माझे मामा यांचा सुद्धा माझ्या आई एवढाच वाटा आहे .त्यांनी मला पोटच्या मुलासारखा माझा सांभाळ केला.माझ्या आई आणि मामा हीच दोन चाके आहेत माझी सह्याद्री सारख्या यशाकडे घेऊन जाणारी.आकाशाएवढं यश मिळवलेल्या सचिनवर मित्रपरिवार,नातेवाईक आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच परिसरातील लोकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असून,पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा देत आहे.

### यश डोळे दिपवून टाकणारे–भारत बडे

आमच्या गावातील सचिन चंद्रकांत नागरगोजे यांने कर सहाय्यक व महसूल सहाय्यक हे जे..!डबल धमाका यश मिळवले आहे महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मधून.खरो-खरच डोळे दिपवून टाकणारे हे यश असून.सचिनने घेतलेले परिश्रम, कष्ट,जिद्द आणि या सर्वांमध्ये ठेवलेले सातत्य याचे हे फळ आहे.सचिनची कामगिरी गावातील आणि परिसरातील मुलांना एक कायमस्वरूपी प्रेरणा स्रोत व यशाकडे जाण्याचा यशाकडे जाण्यासाठी दिशा दाखवत राहील.सचिनचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यास हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

# लग्न वाढदिवसानिमित्त अनाथ मुलांना फळ वाटप



**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे पिंपरी चिंचवड युवक शहर संघटक किरण डावकर यांच्या लग्न वाढदिवसानिमित्त दिव्यांग शाळा व अनाथ आश्रमामध्ये फळं बिस्किट व अन्नदान करून अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.**

किरण डावकर है अनेक दिवसापासून समाजकार्यामध्ये अग्रेसर असून आता ते राजकारणामध्ये सक्रिय झाले आहेत त्यामुळे राजकारण करत असताना २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण हे डोक्यात ठेवून ते काम करत असतात याच माध्यमातून ते अनेक दिवसांपासून समाजासाठी आपलं काहीतरी देणं असतं यासाठी सतत प्रयत्नशील असतात रक्तदान शिबिर असो किंवा हॉस्पिटलचे कुठलेही प्रॉब्लेम आसो सर्वसाधारण कुटुंबाच्या अडचणी मध्ये ते पुढाकार घेऊन या सर्वांना मदत करण्यासाठी अहो रात्री उपस्थित असतात एवढेच नाही तर स्वतःचा वाढदिवस असो किंवा मित्रपरिवार चा वाढदिवस असो इतर खर्च कमी करून गोरगरीब जनतेसाठी व वयोवृद्ध अनाथ मुलांसाठी मदत करण्यासाठी पुढाकार घेऊन सतत प्रयत्नशील असतात.

# भगवान गडावरील माऊली मंदिरासाठी थेरला येथून २ कोटी तर महिलांकडून कळसासाठी साडेबारा लाख

**पाटोदा । प्रतिनिधी**

भगवान गडावर सध्या महंत ज्ञान चार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून राज्यातच नाही तर जागतिक पातळीवर श्रेष्ठ ठरेल असे ज्ञानेश्वर माऊलीचे भव्य मंदिर लोकसहभागातून पुर्णत्वास येत असून यासाठी पाटोदा तालुक्यातील थेरला येथून २ कोटी १ लाख रुपये देणगी जाहीर करण्यात आली. तर मंदिराचा कळस लेकीकडून असल्याने महिलांनीही उत्स्फूर्तपणे साडेबारा लाख रुपये देणगी जाहीर केली. आत्तापर्यंत लोकसहभागातून जाहीर करण्यात आलेल्या देणगी मध्ये थेरला येथून सर्वात जास्त देणगीचा वाटा थेरला ग्रामस्थांनी उचला आहे. पाटोदा तालुक्यातील थेरला हे गाव फार पूर्वीपासून भगवान गडाचे भक्तीस्थान आहे. तर बाबांचेही थेरला गावावर विशेष प्रेम होते.



त्यांनी त्यावेळी शाळा व वस्तीगृहाचाही सुरुवात केली होती व मुले शिकवा ही शिकवण दिली होती. थेरला येथे जवळपास एक कोटीच्या आसपास खर्च करून अप्रतिम असे मंदिर उभारले असून त्यामध्ये विठ्ठल रुक्मिणी, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ महाराज यांच्या मूर्ती प्रतिष्ठापना व भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह दिनांक ५ ते १२ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहात ह.भ.प. नंदकिशोर महाराज बोधेगावकर यांच्या भव्य रसाळ वाणीतून संत भगवान बाबा चरित्र कथाही संगीतमय संपन्न झाली.

दिनांक १२ रोजी न्यायाचार्य नामदेव शास्त्री यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने सांगता होणारा हा कार्यक्रम अतिभव्य व नेत्रदीपक झाला. महंत नामदेव शास्त्री थेरला येथे येणार असल्याने पाडळसिंगी टोलनाक्यापासूनच वाहन रॅली काढण्यात आली. तर थेरला फाट्यावरून शास्त्रींना रथात बसून समोर कलशधारी महिला, वारकरी विद्यार्थी, लेझीम पथक, ढोल पथक, हलगी पथक, बँन्ड अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. तर जीसीबी मधून पुष्पवृष्टी करण्यात आली यावेळी न्यायाचार्य महंत नामदेव शास्त्री यांनी मोठ्या प्रमाणावर तरुण वर्ग समोर आसल्याने सावरगाव येथे बाबांच्या जन्मगावीच्या सप्ताहातील ना. गोपीनाथराव मुंडे यांच्या उपस्थितीतील कीर्तन व नंतर मुंडे साहेबांच्या सांगण्यावरून भगवानगडावर झालेल्या पहिल्या राज्य पातळीवरील ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी आणून केलेल्या सप्ताहाचे वर्णन केले. तर गादीवर बसल्यापासून आजपर्यंतची वाटचाल सांगत गडासाठी थेरला गाव केव्हाही एरव्ही नसले तरी अडचणीत सगळ्यात पुढे असते यांचा आवर्जून उल्लेख केल.तर आताही तुम्ही मागे राहणार नाहीत .असे सांगून देणगीचे आवाहन केले.महंत नामदेव शास्त्री यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे आपआपले देणगीचे आकडे जाहीर केले.तर बाहेरगावी असणाऱ्या अनेकांचा संपर्क झाला नसला तरी उपस्थितातून २ कोटी १ लाख रुपये देणगी जाहीर करण्यात आली.तर मंदिराच्या कळसासाठी बाबांच्या लेकींकडून म्हणजे महिलांकडून साडेबारा लाख रुपये देणगी जाहीर करण्यात आली यावेळी थेरला आतापर्यंत जमा झालेल्या देणगीत सर्वात जास्त वाटा उचलण्याचा मानही थेरला गावाने पटकावला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## पान १वरून...

### ५० लाख सदस्यांसाठी चंद्रशेखर

दिला जाईल लवकरच दीड कोटी प्राथमिक सदस्य, ५ लाख सक्रीय सदस्य,१ लाख १८६ बूथ अध्यक्ष,१ हजार मंडल यामुळे पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे असा विश्वासही व्यक्त केला. चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, प्राथमिक सदस्य नोंदणीबरोबरच ५ लाख सक्रीय सदस्य नोंदविण्याचे लक्ष्य पक्षाने ठेवले आहे. एका बूथवर ५ सक्रीय सदस्य केले जातील. सक्रीय सदस्य झाल्याशिवाय कोणत्याही शासकीय महामंडळावर, जिल्हा, तालुका स्तरीय शासकीय समितीवर नियुक्ती होणार नाही. बूथ अध्यक्ष ते प्रदेशाध्यक्ष अशा सर्वांना सक्रीय सदस्य व्हावे लागणार आहे. डबल इंजिन सरकारमुळेच विकसित महाराष्ट्र होईल हा विश्वास राज्यातील जनतेच्या मनात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शब्दावर, विचारांवर जनतेला विश्वास असल्याने इतक्या मोठ्या संख्येने नागरिक भाजपाचे सदस्य होण्यास उत्सूक आहेत. जनतेचा भाजपावर असलेला हा विश्वास सार्थ करण्यासाठी कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी अखंड कार्यरत रहायला हवे, असे आवाहनही यावेळी केले.

------------

### आ.धस आज घेणार पालकमंत्री

२ वर्षाच्या प्रशासकीय मान्यता मागितल्या आहेत, त्याबाबत त्यांनी अजित पवारांशी चर्चा केली आहे. मी अजित पवारांची भेट घेऊन ५ वर्षांच्या प्रशासकीय मान्यतांचा तपास करण्याबाबत बोलणार आहे. कारण, सर्वाधिक जास्त घोटाळा २०१९ मध्ये झाला आहे. तर, ७२ कोटींच्या घोटाळ्याची यादी मी स्वत: अजित पवारांना दिल्याचे धस यांनी म्हटले. तसेच, २०१९ ते २०२२-२३ मधे सर्वाधिक भ्रष्टाचार झाला आहे. सध्या नियोजन विभागाने केवळ २०२४ आणि २०२५ ची चौकशी लावली आहे. मी अजित पवारांना विनंती करणार आहे, मागील ५ वर्षांची चौकशी करा. कारण, २५ जून २०२३ पर्यंत सर्वांत जास्त बोगस बिले काढण्यात आली आहेत, असेही धस यांनी म्हटले.

-----------

### माघ पौर्णिमेला संगमात

सुरू राहिले. सुमारे अडीच कोटी भाविक त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करतील, असा प्रशासनाचा अंदाज होता. यावेळी भाविकांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. शहरात वाहनांना प्रवेश बंद असून महाकंभमेळा क्षेत्र नो व्हेईकल झोन घोषित करण्यात आले आहे. ही वाहतूक व्यवस्था १२ फेबुवारीपर्यंत स्नान पूर्ण होईपर्यंत लागू करण्यात आली होती. दरम्यान, उत्तर प्रदेशचे डीजीपी प्रशांत कुमार यांनी सांगितले की, महाकुंभातील हे पाचवे स्नान आहे. महाशिवरात्रीचे स्नान अजून बाकी आहे. मौनी अमावस्येच्या दिवशी एक चूक झाली. त्यातून धडा घेऊन अधिक चांगले व्यवस्थापन कसे करायचे? यावर आम्ही काम करत आहोत.

------------

### संसदेत आज आयकर

विधेयकात करदात्याची सनद समाविष्ट करण्यात आली आहे जी करदात्यांच्या हक्क आणि दायित्वांची रूपरेषा देते, असे समजते. गुरुवारी लोकसभेत सादर झाल्यानंतर, हे विधेयक पुढील विचारविनिमयासाठी संसदीय वित्त स्थायी समितीकडे पाठवले जाईल.

------------

### सरकारच्या धोरणांमुळे

योगदान देऊ शकणार नाहीत का? अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का?, असा सवाल करत सरकारच्या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास टाळाटाळ करताहेत. त्यांना कोणतेच काम न करता मोफत योजनांमुळे रेशन व पैसे मिळतात', असे ताशेरेही न्यायालयाने ओढले. याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, सरकारने शहरातील बेघर लोकांना आश्रय देण्यासाठी असलेल्या योजनांना फंड देणे बंद केले आहे. परिणामी यावर्षी देशभरात ७५० बेघर लोक थंडीने गारठून मेले. याचिकेत म्हटले आहे की, गरिबांना सरकारकडून प्राथमिकता न देता फक्त श्रीमतांची चिंता केली जाते; पण यावर नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने म्हटले की,न्यायालयात राजकीय घोषणाबाजी करण्याची परवानगी दिली जाणार नाही. दरम्यान, मोफत योजनांवर सर्वोच्च न्यायालयाने कडक टिप्पणी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी, ९ डिसेंबर २०२४ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या मोफत रेशन वाटपावर कडक टिप्पणी केली होती. न्यायालयाने म्हटले होते की, असे किती काळ मोफत रेशन वाटले जाणार? सरकार रोजगाराच्या संधी का निर्माण करत नाही? तसेच या अगोदर महाराष्ट्र सरकार आणि इतर राज्यांतील लाडकी बहीण योजनेवरही न्यायालयाने ताशेरे ओढले होते.

--------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. १३ फेब्रुवारी २०२५



## क्रीडा मार्गदर्शकांची मानधन तत्त्वावर नियुक्ती होणार

बीड । प्रतिनिधी

केंद्रशासनाच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या खेलो इंडिया या योजने अंतर्गत देशातील विविध जिल्ह्यामध्ये १००० खेलो इंडिया केंद्र पुढील ४ वर्षामध्ये निर्माण करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत बीड जिल्ह्यास कबड्डी या खेळाचे केंद्र सुरु करण्यास मान्यता प्राप्त झाली त्यानुसार जिल्हा क्रिडा संकुल, बीड येथे केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदर योजनेचा उद्देश जिल्ह्यातील उत्कृष्ट १५ मुले व १५ मुली खेळाडूंची निवड करुन त्यांना तज्ञ प्रशिक्षकाद्वारे तंत्रशुध्द प्रशिक्षण देऊन प्रतिभावान खेळाडू तयार करणे हा आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीडला मंजूर झालेल्या खेलो इंडिया कबड्डी केंद्रावर प्रशिक्षण देण्यासाठी पुढील अर्हताप्राप्त प्रशिक्षकांची नियुक्ती मानधन तत्वावर करावयाची आहे.

प्रशिक्षक अर्हता:- १) वयोगट १८ ते ४५ वर्षे यामध्ये अतिउच्च कामगिरी / गुणवत्ता / एशियन गेम्स / जागतिक अजिंक्यपद अधिकृत स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त व प्रशिक्षणाच्या अनुभवासह ३) जागतिक करंडक स्पर्धा / एशियन चैंपीयनशीप / साऊथ एशियन स्पर्धा / संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त खेळाडू - प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ४) राष्ट्रीय किंवा राज्य पुरस्कार्थी प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ५) एनआयएस पदविका किंवा संबंधित खेळाचे अधिकृत लेवल कोर्सेस किंवा बी.पी.एड्. एम.पी.एड. सह राष्ट्रीय स्पर्धा पदक प्राप्त किंवा नॅशनल गेम्स पदक प्राप्त - प्रशिक्षणाच्या अनुभवासह, ६) राज्यस्तर खेळाडू बी.पी.एड., एम.पी.एड. सह कमीत कमी १० वर्ष प्रशिक्षणाचा अनुभव. प्रशिक्षकांची नियुक्ती ही तात्पुरती स्वरुपाची निवळ मानधन तत्त्वावरील आहे. प्रशिक्षक मानधन हे प्रति महिना १५,०००/- ते रुपये २५,०००/- एवढ्या स्वरुपात असेल.

# शेतकऱ्यांनी शेतीच्या योजनेसाठी फार्मर आयडी काढून घ्यावा -तहसिलदार वैशाली पाटील

आष्टी । प्रतिनिधी

केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी आधार कार्डच्या धर्तीवर 'फार्मर आयडी' कार्ड तयार करण्याची योजना राबवली आहे. महसूल प्रशासन ॲग्रिस्टॅक योजनेच्या अंतर्गत गावोगावी बैठका घेऊन शेतकरी आयडी कार्ड तयार करत आहे.या कार्डद्वारे शेतकऱ्यांची एकूण जमीन, घेतलेली पिके,पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ, बँक पीककर्ज माहिती आणि शेतीसंबंधित सर्व महत्त्वाची माहिती एका आयडी क्रमांकाद्वारे उपलब्ध होणार आहे.

या प्रणालीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील आणि कामकाजात पारदर्शकता निर्माण होईल,व शेतक-यांना केंद्र व राज्य सरकारच्या शेती योजनेचा लाभ मिळणार असुन तालुक्यातील प्रत्येक शेतक-यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा असे आवाहन तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले आहे. आष्टी तहसिल कार्यालयात सभागृहात तहसिलदार वैशाली पाटील यांनी बुधवार (दि.१२)रोजी दुपारी ४ वा.आयोजित



करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.यावेळी पुढे बोलतांना पाटील म्हणाल्या,ह्या फार्मर आयडी नसल्यास भविष्यात यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येऊ शकतात.

दरम्यान,शेती संदर्भातील सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.तसेच पीएम किसान योजनेसाठी देखील शेतकरी ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.तरी तालुक्यातील सर्व शेतकर-यांना आवाहन करण्यात येते की,ज्याव्दारे भविष्यातील केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ तुम्हाला घेता येईल. जर आपण आपला फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) बनवीला नाहीतर आपल्याला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार नाही. त्यासाठी जवळच्या महा ई सेवा केंद्रावर जावून पुढील १५ दिवसात आपला ७/१२ ला आधार लिंक करुन घ्यावे व फार्मर आय डी (शेतकरी ओळखपत्र) बनवून घ्यावे व यापुढे भविष्यातील सर्व शेतकरी विषयक योजनांचा लाभ घ्यावा.असे आवाहन तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

### फार्मर आयडीचे फायदे

१.पी एम किसान योजना लाभ सुलभता २.शेतकरी कर्ज वितरण सुलभता ३.पिक विमा योजना लाभ ४.पीक हमीभाव खरेदीसाठी मदत ५.किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज वितरण ६.महा बी टी वरील कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ ७.नैसर्गीक आपत्ती अंतर्गत पिक नुकसानीचे अनुदान मिळेल ८.केंद्र व राज्य शासनाच्या कृषी बाबतच्या सर्व योजनांसाठी आवश्यकहे या आवडीचे फायदे आहेत.

### याठिकाणी काढू शकतात आयडी

ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सी.एस.सी. सेंटर,

आपले सरकार सेवा केंद्र व सर्व सेतु कार्यालय येथे खालील कागदपत्रे आधार कार्ड,आधार लिंक मोबाईल क्रमांक,सर्व ७/१२ व ८अ उतारे लागणार आहेत.

## पाटोद्यातील दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालय वाऱ्यावर

### अधिकारी नसतानाही विद्युत दिवे व फॅन चालू

पाटोदा । प्रतिनिधी

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा होऊनही कामकाजाच्या वेळी अनेक जण दांडी मारत आहेत. आसेच काही चित्र बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयात पहायला मिळते. या दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयातील अधिकारी कधीही वेळेवर कार्यालयात हजर रहात नाहीत तर कधी कधी दुपारनंतरच गायब असतात. त्यांच्यावर कोणाचाही धाक



नाही.

यामुळे वरिष्ठ अधिकारी कार्यालयाने पाटोदा तालुक्यातील दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. कार्यालयात दांडी बहाद्दर अधिकारी वेळेवर उपस्थित राहण्यासाठी थम मशीन बसवण्यात यावी .अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## संत सेवालाल महाराज जयंती उत्सव कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज पंडित

गेवराई । प्रतिनिधी

संत सेवालाल महाराज जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते पृथ्वीराज पंडित यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली असून संत सेवालाल महाराजांची जयंती विविध समाज उपयोगी उपक्रम घेऊन साजरी करणार असल्याचे पृथ्वीराज पंडित यांनी यावेळी सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या जयंती उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या बैठकीला युवानेते पृथ्वीराज पंडित, भवानी बँकेचे संचालक दीपक आतकरे, विनोद सौंदरमल, उत्तमराव सोलाने, रामेश्वर पवार, अनिल राठोड, अजिम इमानदार, सतीश दाभाडे



यांच्यासह बंजारा समाजबांधव उपस्थित होते. यावेळी संत सेवालाल महाराज जयंती उत्सव कार्यकारणीची निवड करण्यात आली.कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी युवा नेते पृथ्वीराज पंडित, उपाध्यक्षपदी रवी पवार, सरपंच शीतल साखरे, कमलेश वाघमारे, शेखर हुंबे यांची तर कार्याध्यक्षपदी सोमनाथ गिरगे, सचिवपदी शेख रहीम, सहसचिव पदी अमित सौंदरमल, कोषाध्यक्षपदी अमोल राठोड, संघटपदी सतिश प्रधान तसेच सल्लागार समितीमते समाजाती सर्व कर्मचारी, राजकीय व सामाजिक पक्ष संघटनाचे पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या बैठकीचे संचलन सुनील चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार अनिल राठोड यांनी मानले. यावेळी बंजारा समाजातील कार्यकर्ते तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

पान ६ वरून...

### रेल्वेचे स्वप्न साकारले परंतू

लांबी असणे आवश्यक होते. तसेच रेल्वे रुफचा पत्रा समोरच्या बाजुने कमी लांबीचा आहे, परिणामी, भविष्यात रेल्वे स्टेशनमध्ये थांबलेल्या प्रवाशांच्या अंगावर पाऊस थेट येऊ शकतो, उन्हाचे चटके प्रवाशांना बसू शकतात. संबंधित कंत्राटदाराने स्वत:च्या फायद्यासाठी असा प्रकार केल्याचा आरोप मेघराज यांनी केला. रेल्वे स्टेशनच्या एकाच बाजुला रेल्वे निवारा केला आहे. समोरच्या बाजुला रेल्वे आल्यास त्या ठिकाणी थांबणाऱ्या प्रवाशांसाठी निवारा उभारण्यात आला नाही. या सोबतच प्रवाशांना एका फलाटावरुन दुसऱ्या फलाटावर जाण्यासाठीचा पुल लवकर तयार करावा अशी अपेक्षा मेघराज यांनी व्यक्त केली.

**भारताशी रेल्वे जोडाव्यात**

स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष पूर्ण झाली, त्यानंतर आता बीडकरांचे रेल्वेत बसण्याचे स्वप्न पूर्ण होत आहे. रेल्वे लाईनचे काम पूर्ण झाले असल्याने आता बीडमध्ये रेल्वे सुरु झाली पाहिजे. बीडमधून भारताशी रेल्वे जोडव्यात अशी अपेक्षा रेल्वे प्रवासी महासंघाचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश नाईकवाडे यांनी व्यक्त केली.

### आष्टी उपवन विभागाकडून

तीन तास हे ऑपरेशन चालू होते. या स्टिंग ऑपरेशन मध्ये आष्टी उपवन विभागाचे श्री .जायभाय( वनपाल), श्री.यादव साहेब( वनरक्षक), श्री. तागड साहेब (वनपाल), श्री .काळे साहेब (वनरक्षक ) श्री आरगडे( वनरक्षक ), श्री .पंदेलवाड( वनरक्षक) , श्री .शिंदे (वनरक्षक )सौ .विधाते मॅडम (वनरक्षक) श्री.अशोक खामकर (वन मजूर,) श्री .भाऊसाहेब पेचे (वनमजूर), श्री नवनाथ उबाळे( वन मजूर), श्री शहादेव टेकाळे (वन मित्र) , श्री युनुस शेख( वनमजूर) श्री हरिभाऊ वनवे आदी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्नानंतर वनवेवाडी येथे बिबट्याला जेरबंद केले या कामगिरीमुळे सर्व स्तरांमधून वनविभागाच्या या स्टिंग ऑपरेशनचे कौतुक होत आहे तसेच शेतकरी व ग्रामस्थांच्या मनामधील भीतीचे वातावरण निर्माण झाले होते ते वातावरण आता बिबट्या जेरबंद केल्यानंतर भिती व दहशत कमी होण्यास मदत होईल.

### राजेंद्र बनसोडे यांना पोलिस

उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाकडून विशेष सेवा पदक तर केंद्र सरकारकडून अंतरिक्ष सुरक्षा पदक देऊन बनसोडे यांचा यापूर्वी गौरव करण्यात आलेला आहे. या कार्याची दखल घेऊन नुकतीच त्यांना महाराष्ट्र पोलीस दलाने पोलीस निरीक्षक म्हणून बढती दिली असून आता त्यांची जालना जिल्ह्यात बदली करण्यात आलेली आहे. राजेंद्र बनसोडे यांचे आष्टी तालुक्यातील विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

### महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून

भटकर यांनी कमी कालावधीत मयताच्या वारसास लाभ मिळवून दिल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.वार्षिक ४३६ रूपये पंतप्रधान जिवन ज्योती योजने अंतर्गत वारस हनुमान तपसे यांना लाभ झाला आहे.महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून दोन लाख रूपायाचा विमा वारसास शाखा व्यवस्थापक विकास भटकर, नवनाथ वाघमोडे, विशाल साकवे,विकास सिंग,सिद्धेश्वर जाधव,राहुल कुलकर्णी यांच्या उपस्थित विमा वारस हनुमान तपसे यांना प्रदान करण्यात आला आहे.

### मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी

उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समिती तर्फे करण्यात आले आहे. तरी माजलगाव तालुक्यातील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांच्या आस्थापना मधील सर्व सहकारी सदस्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी संघटना माजलगाव तालुकाध्यक्ष गोविंद दळवी उपाध्यक्ष अनंत घडशिंगे सचिव अविनाश क्षीरसागर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### भारतीय बौद्ध महासभेच्या

वतीन करण्यात आला.तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे संघटक पांडुरंग जाधव यांनी केले व सुत्रसंचालन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर बौद्धाचार्य डी पी वाघमारे यांनी आभार मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,भगवान डोंगरे,दयानंद साळवे,मोहन काकडे,बाबासाहेब घनघाव,राजेभाऊ साळवे,सिद्धांत साळवे,गणपत भालेराव,विशाखाताई वाघमारे,मंदाताई साळवे,रमाताई राजभोज, वैशालीताई गायकवाड,पोहरेताई, गायसमुद्रेताई,सिमा साळवे, अनुराधाताई साळवे,यांनी परिश्रम घेतले

### आ.सुरेश धसांच्या

आंबेडकरी अनुयायांमध्ये आ.धसांची प्रतिमा मलीन करण्याच्या हेतूने हा डाव रचला जात आहे.तसेच सोशल मीडिया वर आ.धसांची बदनामी करणाऱ्यांवर कठोर शासन करण्यात यावे असे मागणीचे निवेदन आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी देले असुन कठोर शासन करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी डॉ. नरेंद्र जावळे, बाळासाहेब जावळे,, प्रकाश जावळे,चेतन जावळे,दिनेश नारायणकर, आशोक गायकवाड, विजय आडागळे,गणेश रणदिवे सह आदी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

## इनरव्हील क्लबचा संस्कृती विद्यालयात कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय येथे आज इनरव्हील क्लब बीड यांच्यामार्फत कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ .दत्ता नलावडे सर होते.प्रथम आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय श्री . भैय्या सर यांनी करून दिला . चि .वैभव बर्गे व त्याच्या टीमने स्वागत गीताचे गायन केले.**

संस्थाचालक डॉ .दत्ता नलावडे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व संस्थेबद्दलची माहिती पाहुण्यांना दिली .प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना क्लबच्या अध्यक्षा सौ .झोडगे अर्चना मॅडम यांनी क्लबचे काम व या ठिकाणी आल्यानंतर मुलांची शिस्त व निसर्गरम्य परिसर बघून खूप समाधान वाटले असे कौतूक केले .बीडपासून एवढ्या जवळ एवढे सुंदर गुरुकुल आहे याचा अभिमान वाटतो .सध्याच्या काळात अशा गुरुकुलाची आवश्यकता आहे शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण भागात पण आज लहान लहान विद्यार्थी व्यसनाच्या आहारी जात आहेत या गुरुकुलामध्ये शिकणारे विद्यार्थी नक्कीच स्वतःच्या कर्तुत्वाने मोठे होतील व आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करतील असा मला विश्वास वाटतो .

या निसर्गरम्य परिसरात तुम्ही मुलं शिकत आहात तुम्ही भाग्यवान आहात असे प्रतिपादन केले.सर्व परिसर आलेल्या पाहुण्यांनी बघितला . गुरुकुलात मुलांसाठी होणारे विकासात्मक उपक्रम समजून घेतले .पाहुण्यांच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.या कार्यक्रमाला क्लबच्या अध्यक्षा सौ . अर्चना झोडगे,



उपाध्यक्षा स सौ . सुरेखा लोढा , डॉक्टर सौ . मधुमती कोटेचा ,सौ .शोभा बडजाते,सौ .पूजा जाजू , सौ . निर्मला काळे , भावी अध्यक्षा सौ .भारती मुंदडा उपस्थित होत्या . चि .वैभव बर्गेने व्यक्तिगत पद्याचे गायन केले.या कार्यक्रमाला श्री .राम सर, भैय्या सर ,श्री . पठाण सर , श्री .कुलकर्णी सर ,श्री .कांबळे सर , श्रीमती धर्माधिकारी मॅडम ,किरण रेडेकर सर उपस्थित होते .कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.विश्वप्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## दहावी, बारावी विद्यार्थ्यांच्या क्रीडा ग्रेस गुणांबद्दल ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पध्दतीने भरणे बाबत आवाहन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे.

याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन कार्यालयाद्वारे सदरचे अर्ज माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत मंडळास ग्रेस गुण मिळणे करीता पाठविले जातात.

सन २०२३-२४ पर्यंतची ग्रेस गुण प्रक्रीया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती. व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रीया निर्दोष करण्यासाठी या वर्षीपासुन म्हणजेच २०२४-२५ पासुन ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.

खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार ॲपद्वारे या वर्षीपासुन सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचा सवलत गुणांबाबतचा ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सर्व शाळा विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, विद्यार्थी यांनी उपरोक्त विषयासंदर्भात दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची दक्षता घ्यावी. त्यानुसार खेळाडू विद्यार्थी व जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील खेळाडू विद्यार्थ्यांना सदर प्रणालीद्वारे अर्ज करण्या बाबत अवगत करण्यात येत आहे. अधिकच्या माहिती करीता क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांना ९६२३७८११२१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, हे कळवितात.

# एपीएल शिधापत्रिका धारकांच्या बँक खात्यात २ कोटी ७८ लाख रुपये जमा

## आ.विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे २२,१८० लाभार्थ्यांना मिळाला लाभ

**गेवराई । प्रतिनिधी**

**दारिद्र्य रेषेपेक्षा जास्तिचे उत्पन्न असलेल्या शिधापत्रिका धारक शेतकर्यांना धान्या ऐवजी प्रति लाभार्थी प्रतिमाह १५० रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर पैसे जमा होण्यास विलंब होत होता. आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणी गेवराई तहसिल कार्यालयात बैठक घेत पाठपुरावा करुन पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवुन दिला आहे. आ. पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे २ कोटी ७८ लाख ७५ हजार ४०० रुपये डीबीटी प्रणालीव्दारे महिला कुटूंब प्रमुखाच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. गेवराई तालुक्यातील २२,१८० लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हा निधी जमा झाल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.**

गेवराई विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे गेवराई तालुक्यातील महिला कुटूंब प्रमुखाच्या बँक खात्यावर थेट डिबीटी व्दारे २ कोटी ७८ लाख ७५ हजार ४०० रुपये जमा झालेले आहेत. माहे एप्रील २०२३ ते माहे मार्च २०२४ या कालावधीतील प्रति लाभार्थी प्रति माह १५० रुपये प्रमाणे ही रक्कम थेट डिबीटी प्रणालीव्दारे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाली आहे.आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणी पुढाकार घेवुन मागील अनेक महिण्यांपासुन प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावल्यामुळे लाभार्थी शेतकर्यांनी त्यांचे आभार व्यक्त



केले आहेत. आ. विजयसिंह पंडित यांनी अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेसाठी इष्टांक वाढवुन देण्याची मागणी सुद्धा शासनाकडे केली आहे. या दोन्ही योजनांचा लाभ मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज गेवराई तहसिल कार्यालयात प्रलंबित आहेत. दारिद्र्य रेषेपेक्षा जास्तिचे उत्पन्न असलेल्या शिधापत्रिका धारक शेतकर्यांना धान्याऐवजी प्रति लाभार्थी प्रति माह १५० रुपये देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतलेला आहे. गेवराई तालुक्यात त्याची अंमलबजावणी होण्यास होत असलेल्या विलंब प्रकरणी आ. विजयसिंह पंडित यांनी तहसिल कार्यालयात संबंधित अधिकार्यांची बैठक घेतली. या बैठकीतुन त्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकारी यांना थेट संपर्क करुन आठवडाभरात लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर पैसे जमा करण्याची मागणी केली होती. एपीएल शेतकरी योजनेचे गेवराई तालुक्यात १६,२१५ शिधापत्रिका धारक आहेत. प्रशासनाने वारंवार आवाहन केल्यानंतर यापैकी ५,१७० शिधापत्रिका धारकांनी सातबारा उतारा व इतर कागदपत्रे जमा केल्यामुळे हे लाभार्थी योजनेच्या लाभासाठी पात्र झाले आहेत. इतर लाभार्थी शेतकर्यांनी केवायसी करुन सातबारा उतारा तहसिल कार्यालयात जमा करण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या योजनेत माहे एप्रील २०२५ पासुन १५० रुपये ऐवजी १७० रुपये प्रतिमाह देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती या निमित्ताने आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. आ. पंडित यांनी लाभधारक शेतकर्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळवुन दिल्यामुळे तालुक्यात सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरुवार दि.१३ फेब्रुवारी २०२५
४

# देशातील ऊस उत्पादकांच्या खात्यात १६००० कोटी जमा

## महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या खात्यात किती? जाणून घ्या सविस्तर माहिती

देशातील बहुतांश ठिकाणचा उसाचा गळीत हंगाम संपत आला आहे. काही ठिकाणीच उसाचे गाळप सध्या सुरु आहे. दरम्यान, ऊस कारखान्याला गेल्यानंतर १४ दिवसांच्या आता शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले पाहिजेत असा नियम. त्याप्रमाणे बहुतांश कारखान्यांनी शेतकऱ्यांची देणी दिली आहे. तर काही कारखान्यांनकडे अद्यापही देणी बाकी आहेत. दरम्यान, आत्तापर्यंत १६ हजार कोटी रुपयांची देणी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली आहेत. देशातील साडेपाच कोटी कुटुंबांना याचा फायदा झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या खात्यात ५००० कोटी रुपयांची देणी देण्यात आली आहेत. इस्मानं याबाबतची माहिती दिली आहे.



उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांच्या खात्यात सर्वात जास्त रक्कम जमा

देशभरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सुमारे १६ हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत. केंद्राने निर्यात सुरू केल्यानंतर आणि इथेनॉलच्या किमतीबाबत निर्णय घेतल्यानंतर ही रक्कम जारी करण्यात आली आहे. याचा फायदा ऊस लागवड करणाऱ्या सुमारे साडेपाच कोटी कुटुंबांना झाला आहे. या प्रमुख कारखान्यांच्या उद्योग मंडळाच्या मते, साखर कारखान्यांकडे तरलता वाढल्याने देशभरातील सुमारे साडेपाच कोटी ऊस उत्पादक कुटुंबांना फायदा झाला आहे. उत्तर प्रदेशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक ६.५ हजार कोटी रुपये दिले आहेत. यासोबतच कर्नाटक, महाराष्ट्रासह इतर राज्यातील शेतकऱ्यांनाही निधी देण्यात आला आहे.

इथेनॉलच्या दरात केली वाढ

इस्माने दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारच्या चालू २०२४-२५ हंगामासाठी १० लाख टन साखर निर्यातीस २० जानेवारी २०२५ रोजी मान्यता देण्याच्या निर्णयामुळे साखर उद्योगाला आवश्यक चालना मिळाली आहे. तर, २९ जानेवारी २०२५ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने ऊस उप-उत्पादन सी-जड गुळापासून बनवलेल्या इथेनॉलची किंमत १.६९ रुपये प्रति लिटरने वाढवून ५७.९७ रुपये प्रति लिटर केली.

केंद्राच्या या निर्णयांमुळे साखर कारखानदारांवरील आर्थिक भार कमी झाला असून, त्यामुळे सुमारे २० दिवसांत शेतकऱ्यांची देणी देण्यास वेग आला आहे. २०२४-२५ साठी १० लाख टन साखर निर्यातीस परवानगी देण्याचा सरकारचा निर्णय घेतला आहे. यामुळं साखर उद्योगाला दिलासा मिळाला आहे. यामुळं साखर कारखान्यांची तरलता सुधारली आहे, ज्यामुळे त्यांना ऊसाची देयके अधिक जलदपणे पूर्ण करता येतील. त्याचा परिणाम आधीच दिसून येत आहे. केंद्राच्या घोषणेपासून, १६,००० कोटी रुपयांची उसाची देयके देण्यात आली आहेत.




### जागतिक दिवस
### सरोजनी नायडू यांची जयंती.
### व्हॅलेंटाईन आठवड्याचा सातवा दिवस
### (कीस डे)

### महत्वाच्या घटना

१६३० : आदिलशाही आणि निजामशाही संपवण्याच्या उद्देशाने मुघल बादशहा शहाजहान मध्य प्रदेशातील बुर्हाणपूर येथे पोहोचला.
१६६८ : स्पेनने पोर्तुगालच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१७३९ : कर्नालची लढाई पर्शियाच्या नादिरशहाने मुघलांच्या मुहम्मदशहावर तीन तासांत विजय मिळवला. या विजयामुळे नादिरशहाचा दिल्लीत येण्याचा मार्ग सुकर झाला.
१९३१ : आजच्या दिवशी दिल्ली ला भारताची राजधानी घोषित करण्यात आली.
१९४८ : आजच्या दिवशी गांधीजीनी आमरण उपोषणास सुरुवात केली.
१९८४ : युरी आन्द्रेपॉव्ह यांच्यानंतर कॉन्स्टान्टीन चेरेनेन्को सोविएत संघाचे अध्यक्ष झाले.
१९८८ : कॅनडात कॅल्गारी येथे वे१५ हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.
२००१ : पहिले मानव रहित अंतरिक्षयान एरोस नावाच्या लघुग्रहावर उतरले.
२००३ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यश चोप्रा यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान
२०१० : पुणे येथे दहशतवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात १७ ठार, ६० जखमी

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६६ : थॉमस माल्थस प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ डिसेंबर १८३४)
१८३५ : मिर्झा गुलाम अहमद अहमदिया पंथाचे संस्थापक (मृत्यू: २६ मे १९०८)
१८७९ : सरोजिनी नायडू प्रभावी वक्त्या, कवयित्री व स्वातंत्र्यसेनानी, रौलेट कायदा, मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार, असहकार आंदोलन यांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. (मृत्यू: २ मार्च १९४९)
१८९४ : वासुदेव सीताराम तथा वा. सी. बेन्द्रे इतिहासकार (मृत्यू: १६ जुलै १९८६)
१९१० : दत्तात्रयशास्त्री धुंडिराज तथा 'दत्तमहाराज' कवीश्वर वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदांती पंडित (मृत्यू: १ मार्च १९९९)
१९११ : फैज अहमद फैज लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (मृत्यू: २० नोव्हेंबर १९८४)
१९१६ : भारतीय सेनेतील सेवानिवृत्त लेफ्टिनेंट जनरल जगजीत सिंह अरोड़ा यांचा जन्म.
१९४५ : विनोद मेहरा अभिनेता (मृत्यू: ३० आक्टोबर १९९०)
१९७६ : भारतीय चित्रपट अभिनेता शरद कपूर यांचा जन्म.
१९७८ : भारतीय चित्रपट अभिनेता अश्मित पटेल यांचा जन्म.
१९८७ : तमिळनाडू चे माजी मुख्यमंत्री एम. भक्तवत्सलम यांचे निधन.
१९९५ : धावपटू वरुणसिंग भाटी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : रिचर्ड वॅग्नर जर्मन संगीतकार, संगीतसंयोजक व दिग्दर्शक (जन्म: २२ मे १८१३)
१९०१ : लक्ष्मण बापूजी ऊर्फ 'भाऊराव' कोल्हटकर गायक नट (जन्म: ९ मार्च १८६३)
१९६८ : गोपाळकृष्ण भोबे संगीत समीक्षक, गीतकार व कथालेखक
१९७४ : 'सूर रंग' उस्ताद अमीर खाँ इंदौर घराण्याचे संस्थापक व गायक (जन्म: १५ ऑगस्ट १९१२)
२००८ : राजेन्द्र नाथ हिन्दी व पंजाबी चित्रपटांतील विनोदी अभिनेते (जन्म:१९३१)
२०१२ : अखलाक मुहम्मद खान उर्फ कवी शहरयार ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू कवी (जन्म: १६ जून १९३६)

## उसाच्या पाचटापासून मिळवा उत्तम सेंद्रिय खत

ऊस तोडणीनंतर उसाचे पाचट जाळून टाकण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. त्यामुळे नायट्रोजन, कार्बन आणि गंधक हे अन्नघटक वाया जातात. शिवाय जमीन भाजली गेल्याने जमिनीतील उपयुक्त जिवाणूंचा नाश होतो पाचट जाळण्याची मानसिकता बदलून पाचटापासून सेंद्रिय खत तयार केल्यास त्यातून खताची उपलब्धता होऊ शकते वाढत्या महागाई सोबत ऊस उत्पादन खर्चात वाढ होत आहे. रासायनिक खतांचा असंतुलित पद्धतीने वापर केला जातो. त्यातून ऊस पिकाखालील क्षेत्र क्षारपड होण्याचा धोका आहे उसापासून दर हेक्टरी ७ ते ८ टन पाचट उपलब्ध होते. या पाचटाचे सेंद्रिय खत बनविणे हा चांगला पर्याय आहे.

पाचट चिवट असल्याने ते लवकर कुजत नाही. त्याचे लवकर विघटन करण्यासाठी जिवाणूंचा वापर करावा लागतो. त्यासाठी पाचटाचे लहान लहान तुकडे करावेत. पाचटाचे लवकर विघटन होण्यासाठी शेण, माती व पाणी यांचा वापर करावा. पाचटात सेंद्रिय कर्ब प्रमाण जास्त (४५ टक्के) व नत्र कमी (०.३५ टक्के) असल्याने कर्ब नत्र प्रमाण जास्त असते. त्यामुळे पाचटाचे लवकर विघटन होण्यासाठी नत्रपुरवठा युरियामार्फत करावा लागतो. पाचट खतामधील नत्र प्रमाण कमी होऊ नये म्हणून सुपर फॉस्फेट वापरावे. अशा कंपोस्टमधील स्फुरदाची पिकास उपलब्धता वाढते.

पाचट कुजविण्याच्या विविध पद्धती

१) खड्डा पद्धत : ऊस पाचटाचे कंपोस्ट ढीग किंवा खड्डा पद्धतीने करता येते एक टन ऊस पाचटापासून कंपोस्ट करण्यासाठी ४ मीटर लांब, २ मीटर रुंद व १ मीटर खोल खड्डा तयार करावा. त्यात तुकडे केलेले पाचट २५ ते ३० सेंमी. जाडीच्या थराने भरावे. प्रत्येक थरावर पाचट ओले करून त्यावर जिवाणु मिश्रित शेणकाला शिंपडावा, तसेच युरिया, सुपर फॉस्फेट टाकावे. एक टन पाचटास १०० किलो शेणाचा काला वापरावा यासाठी शेणकाला करताना शेण व पाणी १:५ प्रमाणात वापरावे. सर्व थर भरून झाल्यावर पाचटाची वरील बाजू चिखलमातीने बंद करावी. साधारणपणे दीड ते दोन महिन्यांनी खड्डा उघडावा. थरामधील पाचट चांगले मिसळून घ्यावे. त्या वेळी थोडे पाणी शिंपावे व खड्डा पुन्हा चिखलमातीने बंद करावा. कंपोस्ट खतास तपकिरी काळसर रंग येतो व ते सहज कुस्करले जाते. ऊस पाचट खतामुळे शेणखताप्रमाणेच जमिनीची सुपिकता व पीक उत्पादकता वाढते.

२) ढीग पद्धत : ही पद्धत खड्डा पद्धतीसारखीच आहे. फक्त पाचट खड्ड्यात टाकून कुजवण्याऐवजी ढीग करून कुजवतात.

३) खोडवा उसात पाचट कुजविणे शेतात जागेवरच कुजविल्यास खोडवा पिकास उपयुक्त ठरते. यासाठी ऊस तोडणी झाल्यावर राहिलेले पाचट कुट्टी करून एक सरी आड दाबून घ्यावे. साधारणतः एक एकर क्षेत्रासाठी १६ किलो युरिया व २० किलो सिंगल सुपर फॉस्फेटचे २०० लिटर पाण्यामध्ये केलेले द्रावण कीटकनाशकाच्या पंपाचा नोझल काढून सरीमधील पाचटावर फवारावे. यावर दोन किलो कंपोस्ट जिवाणू संवर्धन शेणकाल्यामधून एक एकर क्षेत्रावरील पाचटावर शिंपडून हलकेसे पाणी द्यावे. पाचट थोडेसे दाबल्यानंतर रिजरच्या साह्याने बगला फोडून माती पाचटावर टाकल्यास पाचट जागेवर कुजते जमिनीची उत्पादकता कायम टिकविण्यासाठी जिवाणू खते व पीक फेरपालटीचा अवलंब करण्याबरोबरच सेंद्रिय खतांचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे.



## गांडूळ खत व रासायनिक खत यांच्यातील फरक



पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी सध्या अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत. यामध्ये रासायनिक खते आणि शेतकऱ्यांनी बनवलेले वर्मी कंपोस्ट खत यांचा समावेश आहे. रासायनिक खतांमुळे जमिनीच्या उत्पादकतेत घट होते. याशिवाय मातीचे आरोग्य देखील बिघडते. अशा वेळी शेतकऱ्यांना वर्मी कंपोस्ट खत वापरण्याचा सल्ला दिला जातो. मात्र वर्मी कंपोस्ट खत म्हणजे काय? वर्मी कंपोस्ट खत आणि रासायनिक खतांमध्ये नेमका काय फरक असतो? वर्मी कंपोस्ट खताचे फायदे काय आहेत? याबाबत माहिती घेण्याची गरज आहे.

वर्मी कंपोस्ट खत म्हणजे काय?

वर्मी कंपोस्ट हे सेंद्रिय खत आहे. त्याला गांडूळ खत असेही म्हणतात. हे खत गांडुळे आणि शेणाच्या साहाय्याने तयार केले जाते. गांढूळ खत तयार करण्यासाठी साधारणपणे दीड महिन्यांचा कालावधी लागतो. खतापासून जमिनीचे किंवा वातावरणाचे कोणतेही प्रदूषण होत नाही. या खतामध्ये नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश पुरेशा प्रमाणात आढळतात. जे पिकांच्या वाढीसाठी मदत करतात आणि मातीचा पोत टिकवून ठेवतात.

काय आहे दोघांमध्ये फरक?

सध्या गांडूळ खत अर्थात सेंद्रिय खतांचा वापर करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना दिला जात आहे. मात्र रासायनिक खते आणि गांढूळ यात नेमका काय फरक असतो. तर गांडूळ खत हे रासायनिक खतांच्या तुलनेत खूपच स्वस्त असते.

याशिवाय शेतकरी घराच्या घरी गांढूळ खताची निर्मिती करू शकतात. याउलट रासायनिक खते ही महागडी असून, ती घरी बनवली जाऊ शकत नाही. गांडूळ खतामुळे जमिनीचा पोत सुधारतो. तर रासायनिक खतांचा सतत मारा केल्याने जमिनीची उत्पादन क्षमता घटते. गांडूळ खतामुळे जल, मृदा असे कोणतेही प्रदूषण होत नाही. याउलट रासायनिक खतांमुळे जल, जमीन दोघांचेही प्रदूषण होते.

बाजारात अधिक मागणी

गांडूळ खताचा वापर केल्यास पिकांना कीटकनाशक आणि औषधांचा वापर कमी करावा लागतो. याउलट रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना कीटकनाशके आणि औषधे आधी प्रमाणात वापरावी लागतात. तर गांढूळ खताच्या वापरामुळे पिकांची गुणवत्ता आणि आहार शुद्ध मानला जातो. याउलट रासायनिक खतांच्या वापरामुळे उत्पादित पिके ही केमिकलयुक्त मानली जातात. ज्यामुळे जैविक किंवा गांढूळ खताच्या वापरातून उत्पादन घेतलेल्या पिकांना बाजारात खूप मागणी असते.

गांढूळ खताचे फायदे

शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होते. रासायनिक खतांवरील खर्च कमी झाल्याने, तसेच जैविक उत्पादनांना अधिक मागणी असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होते. गांढूळ खताच्या वापरामुळे शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होत नाही. गांढूळ खतामुळे जमिनीत गारवा कायम राहतो. त्यामुळे पिकांना पाणी देण्याची गरज रसायनुईक खतांच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे पाण्याची बचत होते. बाजारात रासायनिक खतांचा नेहमी तुटवडा असतो. मात्र, गांढूळ खत तयार करण्याचे योग्य नियोजन केल्यास, शेतकऱ्यांकडे नेहमी खत उपलब्ध राहते.

## शेणखतापासून तयार करा माशांचा चारा; आर्थिक उत्पादनात होईल वाढ

शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते.

मत्स्यपालनासाठी तळ्याची खोली किती असावी?

मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा

कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.



शेणामुळे माशांचे वजन वाढेल

जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण

भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच आयसीएआर ने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

# पालकमंत्र्यांचा आला गाडा आणि गोरगरीबांची घरे पाडा

## पुढारी, धनदांडग्यांना अभय ; सामाजिक कार्यकर्त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना बीड शहर स्वच्छ आणि सुंदर दिसावे यासाठी आज पहाटे नगर रोडवरील सामाजिक न्याय भवन आदि ठिकाणी असणारी चहाचे हातगाडे, टपरीधारक तसेच फुल विक्रेते, आदि हातावर पोट भरणा-या गोरगरिबांच्या साहित्यांची नासधूस करून वाहनात टाकुन घेऊन जाण्याची मर्दुमकी नगर परिषद प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी दाखवली वाहतुकीस अडथळा अथवा अपघाताला निमंत्रण न करणारी गोरगरीबांचे हातगाडे,टपरी उचलून नेताना बीड शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमित बांधकामे




त्याच बरोबर बिंदुसरा नदीपात्रात फ्लड झोन ,पुररेषेत असणारी अतिक्रमित बांधकामे,भुमाफियांनी नगरपरिषद आधिका-यांशी संगनमताने केलेली प्लॉटिंग याकडे सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संघटना यांनी दिलेले निवेदने व आंदोलने याकडे सोयीस्करित्या दुर्लक्ष करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनाने भूमिका घेऊ नये सर्वांना समान न्याय द्यावा या मागणीसाठी आज दि.१२ बुधवार रोजी दुपारी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ते डॉ .गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना नितीन सोनवणे, बीड शहर सचिव वंचित बहुजन आघाडी संदिप जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कार्याध्यक्ष राजु कांबळे , शेख मुस्ताक , आबासाहेब जगताप, शेख अकबर आदी सहभागी होते.

जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. नगर रोडवरील सामाजिक न्याय भवनासमोर शेख अकबर यांची कित्येक वर्षांपासून चहाची टपरी आहे.दोन मुले एक आठवी आणि दुसरा ६ वीत शिकत आहेत. बालेपीर भागात राहणारे शेख अकबर यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यावरच चालायचा आज नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी टपरी तोडुन मोडुन गाडीत टाकून घेऊन गेले आता पुढे घर चालवायचे कसं असा त्यांना प्रश्न पडला आहे. बीड शहरातील जाणाऱ्या ठिकाणी बिंदुसरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमित बांधकाम आहेत.जर १९८९ सारखी पुरस्थिती निर्माण झाली तर मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि जिवितहानी होऊ शकते.नगरपरीषदेने सीमा रेषा आखून देणे,फ्लड झोन,ग्रीन झोन,रेड झोन, यल्लो झोन आदी बाबत आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात यासाठी सामाजिक कार्यकर्ते यांनी वारंवार निवेदने आणि आंदोलने केलेली आहेत मात्र याकडे जिल्हा प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन मुग गिळून गप्प असुन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहे.मात्र त्याचवेळी गोरगरिबांच्या टपरी आणि हातगाडी धारकांवर कारवाई करण्यात धन्यता मानत आहे.ही भुमिका दुटप्पी असुन याच आम्ही निषेध करत आहोत.

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात संत रोहिदास महाराज जयंती साजरी

### मुंबई पोलीस सेवेत भरती तरूणांचा सत्कार



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि. १२ फेब्रुवारी बुधवार रोजी संत रोहिदास यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, ग्रामपंचायत कर्मचारी जिवन मुळे, सुखदेव वाणी, कचरू निर्मळ,सुरेश निर्मळ,दादा गायकवाड, पप्पू निर्मळ, विलास काटे, विक्की जाधव,यांची प्रमुख उपस्थिती होती.

.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रविंद्र निर्मळ यांनी तर आभार प्रदर्शन चंद्रकांत आवसरे यांनी केले. प्रमुख वक्ते म्हणून संत रोहिदास यांच्या जीवनपट उलगडताना सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी संत रोहिदास यांच्या लोकप्रिय हिंदी दोहा'' मन चंगा तो कठौती मे गंगा'' विश्लेषण करताना माणसाचे मन पवित्र असेल, त्याला जातीयवादाचा स्पर्श नसेल तर चांभाराच्या कुंडातही गंगाजलाचे पावित्र्य दिसून येते. रामभक्तीत दंग असणारे रविदास महाराज हातानं चप्पल बनवत असताना तोंडाने रामनाप जप करण्यात तल्लीन असायचे.त्यांनी केलेल्या सुंदर , अर्थपूर्ण कवितांचा 'गुरू ग्रंथ साहिब ''या शिखांच्या धर्मग्रंथामध्ये समावेश आहे.संत रोहिदास यांनी भारतभर फिरून समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे धडे देत देशाला अध्यात्मिक आणि सामाजिक उपदेश दिला. असे प्रतिपादन केले. याचवेळी लिंबागणेशचे भुमिपुत्र आकाश नामदेव निर्मळ आणि बुद्धभुषण हरिश्चंद्र निर्मळ या मुंबई पोलीस सेवेत भरती झालेल्या तरूणांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी पिनु निर्मळ, रामदास निर्मळ, बबिता निर्मळ, विलास काटे,डिगांबर निर्मळ,आरूण निर्मळ, अमोल निर्मळ, शंकर निर्मळ यांची उपस्थिती होती.

## तांदळवाडीघाट येथील शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

बीड। प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमध्ये आज इयत्ता दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना निरोप देण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री श्याम डाके सर हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तांदळवाडी घाट या गावचे उपसरपंच महादेव अण्णा खोसे व अंधापुरी गावचे सरपंच पप्पूजी जगताप जि प प्र शा तांदळवाडी घाटचे मुख्याध्यापक क्षीरसागर सर त्याचबरोबर राम हरी भागडे ग्रामपंचायत सदस्य ज्येष्ठ नागरिक श्री विकास जगताप विनायकराव काळे हे या कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात रोहिणी भागडे व अमृता खोसे यांनी स्वागत गीत गाऊन केली विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना इयत्ता आठवी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले खूप खूप भाऊक अशा वातावरणामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील आठवणींना उजाळा देऊन सर्व शिक्षकांचा सत्कार व पाहुण्यांचा सत्कार विद्यार्थ्यांनी केला महादेव अण्णा खोसे यांनी सर्व विद्यार्थ्यांना सांगितले की शिक्षणामुळे माणसाचे भावी जीवन उज्वल होते आई-वडिलांची सेवा करा कुठल्याही क्षेत्रामध्ये गेलात तरी आपल्या शाळेला विसरू नका असे सांगून डॉ योगेश भैय्या क्षीरसागर साहेब यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी इयत्ता दहावीला उत्तम मार्क घेऊन संस्थेचे नाव उज्वल करा अशी भावना त्यांनी व्यक्त केली डाके सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की आत्मविश्वास चारित्र्य व स्वभाव गुण जपल्यास तुम्हाला उज्वल भविष्यामध्ये कुठेही अडचणी येणार नाहीत व परीक्षेत शुभेच्छा देऊन आपल्या शाळेचे नाव उज्वल करा अशी भावना व्यक्त केली या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कल्याणरावजी वामने सर यांनी केले कार्यक्रमाची संचलन इयत्ता दहावीचा विद्यार्थी गणेश खोसे यांनी सुंदर संचलन केले कार्यक्रमाचे आभार गणेश रावजी काशीद सर यांनी मानले शाळेमध्ये इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीला निरोप देण्यासाठी मिष्ठान्न भोजनाच आनंद घेतला इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेट म्हणून डिजिटल बोर्ड दिले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## संत तुकाराम महाराज जयंतीनिमित्त वक्तृत्व व अभंग गायन स्पर्धा

बीड। प्रतिनिधी

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धा बीड येथे संपन्न झाल्या. त्यानिमित्त बक्षिस वितरण करण्यात आले. मराठा सेवा संघ प्रणित संत गाडगेबाबा प्रबोधन कक्षाच्या वतीने मागील आठ वर्षांपासून संत तुकाराम महाराजांची जयंती विविध प्रकारच्या उपक्रमाने साजरी करण्यात येत असते. यावर्षी संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज जन्मोत्सवानिमित्ताने भाषण स्पर्धा आणि अभंग पाठांतर स्पर्धा बीड शहरातील ज्ञानधन गुरुकुल अंकुश नगर येथे संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अशोकजी ठाकरे , प्रमुख पाहुणे बीड जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे, जिल्हा सचिव प्रा. पंजाबराव येडे, मराठा सेवा संघ प्रणित संत गाडगेबाबा प्रबोधन कक्षाचे जिल्हाध्यक्ष ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे, जिल्हा कार्याध्यक्ष ह.भ.प. सुधाकर महाराज शिंदे, जिल्हा सचिव ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे, ज्ञानधन गुरुकुलचे संचालक माधव काळकुटे इ. उपस्थित होते. त्यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग गायन तसेच भाषणे केली. स्पर्धेसाठी १५० पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचा



मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व महापुरुषांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचा संच देऊन सन्मान करण्यात आला. त्यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संत तुकाराम महाराजांचे विचार आजही समाजाला अत्यावश्यक असल्याचे मान्यवरांच्या बोलण्याचा रोख होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अंकुश पवार यांनी केले. संत तुकाराम महाराजांच्या नमनाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.


### जाहीर प्रगटन

**ॲड एस.जी.घोलप मा.श्रीमती एस.एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश. व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २००/२०२५**

**ॲड.एस.जी.घोलप**

**गणेश रावसाहेब घोडके वि. निरंक**

अर्जदार १. गणेश पि. रावसाहेब घोडके, वय ५३, धंदा शेती, रा. शहाजानपुर पो. कामखेडा, जि. बीड सोमित्रा भ्र. बबन गोरे, वय ४५, धंदा घरकाम, रा. सदर

विरूध्द निरंक

प्रकरण :- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत अलकनंदा भ्र. रावसाहेब घोडके यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत अलकनंदा भ्र. रावसाहेब घोडके हे दिनांक ०९/०४/२०२३ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र.२ ही मयताची विवाहित मुलगी आहे. वरील अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्युपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता व मयताच्या नावे असलेल्या मिळकतीवर नावे लावण्याकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख २४/०३/२०२५ आज दिनांक १२/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का



### जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६ वे सह, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८०६/२०२५**

**विमलबाई सदाशिव तुपे विरुध्द निरंक**

अर्जदार : १. विमलबाई भ्र. सदाशिव तुपे वयः ८२ वर्षे, धंदा शेती रा पिंपळवाडी, ता.बीड, २. शामराव पि. सदाशिव तुपे वय ५४ वर्षे, धंदा शेती. रा. सदर,३. भिमराव पि. सदाशिव तुपे वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. सदर,४. शकुंतला भ्र.बाळासाहेव हावळे वय ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. देवगिरी कॉलनी, जुना धानोरा रोड, नविन सरस्वती विद्यालयसमोर, बीड ता. जि. बीड

गैरअर्जदार - विरुद्ध- कोणी नाही

मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सदाशिव पि. तात्याबा तुपे, यांचे वारस असल्या बाबती मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी - सदाशिव पि. तात्याबा तुपे यांचा मृत्यु दि.१७/०८/२००९ पिंपळवाडी, ता. जि.बीड येथे मयत झालेले असून अर्जदार नं. १ ही मयताची पहिली पत्नी असून अर्जदार २ व ३ हे मयताचे मुले आहेत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे ताराखेपासू एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत - सदाशिव पि. तात्याबा तुपे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१ माहे ०१ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील

तारीख दि.१०/०३/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

शिक्का


## मूकनायक पुरस्कार सोहळ्यास उपस्थित रहा - प्रा.वंजारे

बीड। प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या' मूकनायक ' या पाक्षिकामागील सामाजिक जाणीव आणि बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेचा वारसा जतन करण्यासाठी मराठवाड्यातील ' शाक्यमुनि प्रतिष्ठानने यंदा राज्यस्तरीय ' मूकनायक पुरस्कार ' सुरू केला आहे. पहिल्या वर्षातील या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांची निवड करण्यात आली आहे. ते गेली ३५ वर्षे पत्रकारितेत असून मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदस्य आहेत. या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे आहे. त्याची घोषणा छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या एका बैठकीनंतर ' शाक्यमुनि प्रतिष्ठान ' चे अध्यक्ष प्रा. शरद वंजारे,उपाध्यक्ष प्रा.दिपक जमधाडे आणि सचिव प्रा. डॉ. संजय कांबळे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे. या बैठकीला सारीका वाघमारे, किशोरी मस्के,उज्वल गायकवाड, सिध्दार्थ वाघमारे हे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. दिवाकर शेजवळ यांना ' मूकनायक पुरस्कार ' येत्या रविवारी १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता. अशोका हॉल पी.ई.एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित समारंभात देण्यात येणार आहे. प्रा. शरद वंजारे यांच्या अध्यक्षतेत या समारंभाला ॲड.जयमंगल धनराज अशोक सिरसे साहेब (प्रकल्प संचालक छत्रपती संभाजीनगर) प्राचार्य डॉ. अभिजित वाडेकर (पी.ई.एस.अभियांत्रीकी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर) ज्येष्ठ पत्रकार विजय बहादुरे आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.


जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १३/०२/२०२५

### जाहीरनामा

ख.खत -पी आर कार्ड

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १) जिवन शिवराम चिंतामणी रा बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. सर्व्हे नं.- १५२ पैकी तरफ बोबडे क्षेत्र-१११.५२ चौ.मी. वर श्री/सौ. अरुण नारायणराव गायकवाड बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व- माझी बाकी जमीन
पश्चिम-१५ फुटाचा रस्ता
दक्षिण - चितामणीचा प्लॉट
उत्तर - रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**


## शिवजयंतीनिमित्त रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताह



बीड। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मागील १३ वर्षांपासून बीड तालुक्यातील रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. या सप्ताहास बुधवार, १२ फेब्रुवारीपासून श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशितील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांनी आवाहन केले आहे.

या सप्ताहात भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी रतनताई महाराज, १३ रोजी शिवाजी महाराज नेवडे, १४ रोजी ज्ञानेश्वरीताई कृष्णा रत्नपारखी, १५ रोजी बाळकृष्ण महाराज मोरे, १६ रोजी श्रीकृष्ण महाराज उबाळे, १७ रोजी उत्रेश्वर महाराज पुर्भे, १८ रोजी परमेश्वर महाराज माने यांचे प्रवचन होणार आहे. तसेच रोज रात्री ९ ते ११ वेळेत कीर्तनसेवा होणार आहे. तर १९ फेब्रुवारी रोजी सकाळी शिवजयंतीनिमित्त गावात मिरवणूक निघणार आहे. व स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. तरी पंचक्रोशितील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या सप्ताहामध्ये १२ फेब्रुवारी रोजी विनोदाचार्य भाऊसाहेब महाराज पन्हाळकर, १३ रोजी भागवताचार्य दत्ता महाराज हुके, १४ रोजी विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे, १५ रोजी वारकरीभुषण अण्णा महाराज शेळके, १६ रोजी बालकिर्तनकार सोहम महाराज सातपुते, १७ रोजी आचार्य भगवंत महाराज पुरी, १८ रोजी विनोदाचार्य परमेश्वर महाराज इंगळे यांची कीर्तन सेवा होणार आहे. सप्ताहाबरोबरच दरवर्षीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर, वृक्षारोपण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी रक्तदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यावेळीही जास्तीत जास्त तरुणांनी रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १३/०२/२०२५

### जाहीरनामा

ख.खत -७/१२

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १)संजीवनी भ्र. राजेंद्र उबाळे रा बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. सव्हे नं.- २१२ पैकी तरफ पिंगळे क्षेत्र-१८५.८७ चौ.मी. प्लॉट नं. वर श्री/सौ. नवनाथ पि. किसनराव सोनवणे बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व-जाधव व सोनवणे यांची उर्वरित जमीन
पश्चिम शाहु शिक्षण संस्थेची जमीन
दक्षिण - यापूर्वी विक्री केलेला प्लॉट
उत्तर - १५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**



जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १३/०२/२०२५

### जाहीरनामा

ख.खत

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १)भुषण जनार्धन जाधव २. अनुराधा भुषण जाधव रा बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. १/४ ७२०० सव्हे नं.- ६० पैकी तरफ गिराम क्षेत्र-१६८.७३ चौ.मी. रोहाऊस बंग्लो क्र. ४ नं. वर श्री/सौ. प्रिना शरद बागमार व इतर बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
पूर्व-उबाळे यांची जमीन
पश्चिम-रो-बंग्लो क्रमांक ४
दक्षिण - गजानन मार्वेल अपार्टमेंट
उत्तर - ६ मिटर रुंदीचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**



जा.क्र./बीनप/कावि/वसुली-कार्यालय नगर परिषद बीड
दिनांक १३/०२/२०२५

### जाहीरनामा

कोर्ट वारस, मृत्यू प्रमाणपत्र ख खत अधारे

प्रकरण - मालमत्ता रजिस्टरवर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यासाठी (नाव बदलण्याबाबत /नांव लावण्या बाबत / क्षेत्रफळ दुरूस्ती) बाबत.

अर्जदाराचे नाव व पत्ता १)सुभद्राबाई सहदेव साबळे रा बीड

सर्व जनतेस जाहिर करण्यात येते की, घर क्र. सव्हे नं.- २०३ पैकी तरफ पिंगळ क्षेत्र-२७८.८१ चौ.मी. प्लॉट नंबर २२ वर श्री/सौ. सहदेव बाबुराव साबळे मयत बीड चे नांव मालमत्ता रजिष्टरला नोंद आहे / नाही. वरील अर्जदाराने या कार्यालयात नाव बदलण्यास / नांव लावण्यास / क्षेत्रफळ दुरूस्तीस अर्ज केला आहे. या विषयी कोणास आक्षेप असेल हरकत असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज करणे. मुदतीनंतर कायद्याप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येईल.

चतुः सिमा
कोर्ट वारस, मृत्यू
प्रमाणपत्र अधारे

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, बीड.**

राज्य लोकतंत्र
गुरूवार, दि.१३ फेब्रुवारी २०२५ | ६

# रेल्वेचे स्वप्न साकारले परंतू रेल्वे स्थानकात प्रवाशांची गैरसोय

## मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

अहिल्यानगर बीड परळी हा रेल्वे मार्ग बीड जिल्ह्याच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. अनेक वर्षापासून चे स्वप्न हे साकार होत आहे. मात्र याच साकारलेल्या स्वप्नांचे प्रत्यक्षात अडचणी देखील दिसून येत आहेत. जिल्ह्याचे ठिकाण असणारे बीड या ठिकाणी भविष्यामध्ये जंक्शन देखील होऊ शकते अशा प्रकारचे भविष्य वेध हे बीड रेल्वे स्थानकाच्या दृष्टीने पाहिले जात आहे. मात्र या स्थानकातच प्रवाशांच्या संदर्भात स्थापत्य विभागाकडून अत्यंत प्रकारच्या गैरसोयी गंभीर आहेत. त्यात प्रशासनाकडून तत्काळ सुधारणा व्हावी अशी मागणी मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने भेट देत पाहणी करून केली आहे.

बीड शहरात नव्याने बांधण्यात आलेल्या रेल्वे स्थानकास त्यांनी बुधवारी भेट दिली. या प्रसंगी त्यांच्या सोबत मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश नाईकवाडे, खदीर लाला हाश्मी उपस्थित होते. महासंघाचे अध्यक्ष मेघराज म्हणाले की, रेल्वेचे रुफ केवळ चार कोच पर्यंत पुरतेच मर्यादीत आहे. या रुफची लांबी किमान आठ किंवा त्या पेक्षा अधिक कोच पर्यंत

पान ३ वर



### अन्यथा याचा त्रास रेल्वे प्रवाशांना होईल

बीड शहरानजीक नव्याने बांधण्यात आलेल्या रेल्वे स्थानकाच्या कामात अनेक त्रुटी आहे. अहिल्यानगर-बीड रेल्वे गाड्या सुरु होण्यापूर्वी बीड रेल्वे स्थानकातील त्रुटी दूर झाल्या पाहिजेत. अन्यथा याचा त्रास रेल्वे प्रवाशांना होईल असे मत मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष अरुण मेघराज यांनी व्यक्त केले.

### मालवाहतुकीतून रेल्वेचे उत्पन्न वाढेल

बीड-छत्रपती संभाजी नगर रेल्वे मार्गाचा सर्व्हे आधीच पूर्ण झाला झाल्यानतर इतर एक्सप्रेस रेल्वे बीडशी जोडल्या जातील. रेल्वे बीडमध्ये येणार असल्याने मालवाहतुक सोपी होईल. त्यातच आता धाराशीव-बीड-छत्रपती संभाजी नगर रेल्वे मार्गाचा सर्व्हे आधीच पूर्ण झाला आहे. त्यामुळे हा मार्ग झाला तर बीड शहर हे रेल्वेसाठी मध्यवर्ती ठिकाणी होईल. वाहतूक सुविधा निर्माण झाल्यास मोठ्या कंपन्या बीडमध्ये येतील परिणामी बीडचा विकास झपाट्?याने होईल असे अपेक्षित आहे. वाहतुकीवर खुप काही निर्भरट्रक किंवा इतर वाहनांच्या मदतीने इतर जिल्ह्यातील किरणा, लोखंड, स्टील, खते यासह इतर माल बीडमध्ये पोहोचतो. वाहनाद्वारे होणारे वाहतुक खर्चिक असते. परंतु रेल्वेद्वारे माल वाहतूक कमी खर्चिक असते. शिवाय कमी वेळेत देशभरात इतर ठिकाणी माल आणला नेला जाऊ शकतो. वाहतुकीवर खुप काही निर्भर त्यामुळे वाहतूक दर कमी असल्यास माल ने-आण करण्यास आर्थिक झळ बसत नाही. त्याचा फायदा व्यापाऱ्यांना होईल.

### पीट लाईन आहे आवश्यक

बीड येथील रेल्वे स्थानकामध्ये पीट लाईन आवश्यक आहे. पीट लाईन म्हणजे रेल्वे स्थानकाच्या ठिकाणी रेल्वेच्या मेंटनन्सचे काम होते. पीट लाईन सुरु झाली तर बीडपासून इतर जिल्ह्यात रेल्वे गाड्या सोडल्या जाऊ शकतात. रेल्वे सुरु होण्यापूर्वी प्रवाशांच्या सुरक्षेच्या संदर्भातील सर्वच्या सर्व कामे होणे आवश्यक आहे असल्याचे रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष अरुण मेघराज म्हणाले.



### ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीच्या वतीने सत्कार

मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश नाईकवाडे, खदीर लाला हाश्मी बुधवारी बीड जिल्हा दौऱ्यावर आले होते. बीड येथील रेल्वे स्थानकाची पाहणी केल्यानंतर त्यांनी जेष्ठ स्वातंत्र्य सनिक रेल्वे कृती समिती चे सदस्य तथा संपादक सुनील क्षीरसागर यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळाचा सत्कार केला. ज्येष्ठ संपादक स्व. नामदेवराव क्षीरसागर यांच्या या रेल्वे मार्ग संदर्भातील अथक परिश्रमाबद्दल तसेच प्रशासकीय पातळीवर त्यांचा असलेला पाठपुरावा याविषयी चर्चा झाली त्याचबरोबर जिल्ह्याचे ठिकाण असणारे बीड या ठिकाणी रेल्वे जंक्शन संदर्भात तसेच प्रवाशांची कशाप्रकारे अधिक उत्तम व्यवस्था सोय होईल यासह अनेक विषयावर चर्चा झाली.

# आष्टी उपवन विभागाकडून वनवेवाडी येथे बिबट्या जेरबंद

**पाटोदा । प्रतिनिधी**

सविस्तर वृत्त असे की, आष्टी तालुक्यातील मातावळी,वनवेवाडी ,तसेच भुरेवाडी परिसरामध्ये गेल्या अनेक वर्षापासून बिबट्या वावरत होता, अनेक वेळा शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्याचे चित्र आष्टी तालुक्यामध्ये पाहायला मिळाले. शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण होते पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी येथील वृद्ध महिलेवर हल्ला झाल्यानंतर त्या वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला होता , त्यामुळे शेतकऱ्या



व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. यामध्ये आष्टी तालुक्यातील वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष धाडसी मोहीम राबवून वनवेवाडी येथे बिबट्याला जेरबंद केले. बिबट्या विहिरीमध्ये पडल्याचे तेथील ग्रामस्थांनी संबंधित वन विभागाला संपर्क केल्यानंतर आष्टी उपवन विभागातील अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी उपवन विभागातील कर्मचारी व सौताडा येथील वनविभागाचे कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नानंतर स्टिंग ऑपरेशन यशस्वी झाले. तब्बल दोन ते

पान ३ वर

## पोपट खंदारे यांची महाराष्ट्र वीज नियमक आयोगाच्या अतिरिक्त संचालकपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कारेगव्हाण येथील पोपट अभिमान खंदारे यांची महाराष्ट्र वीज



नियमक आयोगाच्या अतिरिक्त संचालकपदी मंगळवारी (दि.११) निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

पोपट खंदारे यांचे प्राथमिक शिक्षण हे कारेगव्हाण येथे जिल्हा परिषद शाळेत झाले आहे. त्यानंतर माध्यमिक शिक्षण हे सारणी (सां.) येथे झाले. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथून सन २००० मध्ये पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापिठातून पुढील शिक्षण पूर्ण केले. तसेच, नोकरी लागल्यानंतर त्यांनी महावितरण कंपनीच्या बीड, चौसाळा, कुर्डूवाडी, बारामती कार्यालयात अभियंता आणि विविध पदावर कामकाज केले. त्यांना ग्रामीण भागात काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. त्यांची महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या अतिरिक्त संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# वंचित बहुजन आघाडीची बीडमध्ये होणार भव्य निदर्शने

## वैयक्तिक लाभासाठी ग्रामसभेची अट रद्द करावी ही असणार प्रमुख मागणी

**बीड । प्रतिनिधी**

अनुसूचित जातीच्या योजना, विशेष घटक योजना,ओटीएसपी योजना या वैयक्तिक लाभाच्या योजना असून या योजनेसाठी विविध विभाग ग्रामपंचायत चा ठराव असणे बंधनकारक आहे असे सांगून योजनेपासून वंचित ठेवण्याचे काम सुरू आहे. वैयक्तिक लाभासाठी ग्रामसभेच्या ठरावाचा निकष रद्द करण्यात यावा तसेच ग्रामीण भागातील घरकुल आवास योजनेसाठी १ लाख २४ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते वाढती महागाई पाहता रमाई घरकुल आवास योजनेसाठी ५ लाख रुपये अनुदान देण्यात यावे, महात्मा फुले विकास महामंडळाला भरीव निधी प्राप्त करून द्यावा या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष बीड यांच्या आयोजनामध्ये दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी ठीक ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय समोर भव्य निदर्शन करण्यात येणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



माजलगाव:- येथील ग्रामीण रुग्णालयातील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.मुजीब सौदागर यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ श्रीराम खळगे,वंचीत आघाडीचे नेते अंकुश जाधव व पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे

# राजेंद्र बनसोडे यांची पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील रुई नालकोल येथील राजेंद्र आनंदराव बनसोडे यांना एपीआय पदावरून पोलीस निरीक्षक पदी बढती मिळाली आहे.सध्या ते छत्रपती संभाजी नगर येथे कार्यरत असुन आता त्यांची जालना जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे.



राजेंद्र बनसोडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २००९ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली होती. त्यांनी महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रथम नेमणूक चंद्रपूर येथे झाली.तेथे नक्षलवाद विरोधी अभियान ,गुन्हे शोध पथक ,चंद्रपूर शहर शिवाय गडचिरोली मध्ये सी ६० पथक इत्यादी ठिकाणी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे येथे नकली नोटा व छपाई वितरण प्रकरण उघडकीस आणून पश्चिम बंगाल येथील गुन्हेगारी टोळीस अटक केली होती. ही त्यांची मोठी कारवाई समजली जात होती. त्यानंतर त्यांना महाराष्ट्र पोलीस दलाने २०१३ साली सहाय्यक पोलीस निरीक्षक मधून म्हणून बढती दिली होती. २०१३ ते २०१८ पर्यंत धाराशिव येथे वेगवेगळ्या ठिकाणी कर्तव्य बजावले. २०१८ ते २०२२ या काळात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे कार्यरत असून गंगापूर ,बिडकीन ,फुलंब्री या ठिकाणी कर्तव्य बजावले आहे. २०१८ मधील कायगाव टोका गोदावरी नदी पुलावरील मराठा आरक्षण आंदोलनास लागलेले हिंसक वळण आणि त्यानंतर दाखल झालेल्या संवेदनशील व गंभीर गुन्ह्यांचा तपास कसोशीने केलेला आहे. राजेंद्र बनसोडे यांनी केलेल्या

पान ३ वर

## तलाठी व कोतवाल यांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक करा -अभिजीत लोमटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील सर्व तलाठी यांनी कार्यालय तालुक्याच्या



ठिकाणी थाटले असून ते या ठिकाणीही उपस्थित नसतात यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे तलाठी यांना त्यांचा सज्जा ज्या गावचा आहे त्या सज्जावर उपस्थित राहणे बंधनकारक करावे तसेच तलाठी सज्जावर कार्यरत खाजगी व्यक्तीमुळे शासकीय गोपनीयतेचा भंग होत असल्याचे निदर्शनास येत आहे त्यामुळे खाजगी व्यक्तींना काम करण्यास मज्जाव करावा. तसेच अंबाजोगाई तहसील तसेच उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे कार्यरत असणारे कोतवाल यांची नियमाप्रमाणे ज्या ठिकाणी निवड झाली त्या नियुक्तीच्या ठिकाणी कोतवाल यांना पाठवावे अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा पत्रकार अभिजीत लोमटे यांनी दिला आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून मयताच्या वारसाला मिळाला दोन लाखाचा विमा

## माजलगाव शाखेचे व्यवस्थापक विकास भटकर यांच्या पाठपुराव्याला यश

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ग्रामीण बँकेच्या खातेदार मोठेवाडी येथील मयत स्वाती हनुमान तपसे यांचा अपघाती मृत्यू झाला.त्यांचे वारस पती हनुमान जनार्दन तपसे यांनी माहे डिसेंबर रोजी क्लेम दाखल केला. बँकचे व्यवस्थापक विकास भटकर यांनी वरिष्ठ स्तरावर योग्य ते पाठपुरावा योग्य त्या वेळात केल्यामुळे वारसांना



एक महिन्यात बँकेकडून दोन लाख रूपायाचा विमा योजनेचा लाभ मिळवून दिला.

महाराष्ट्र ग्रामीण बँक माजलगावचे व्यवस्थापक विकास

पान ३ वर

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचा १४ फेब्रुवारीला बीड येथे भव्य मूक मोर्चा

माजलगाव । प्रतिनिधी :

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत काम करणाऱ्या सर्व आस्थापनातील प्रशिक्षणार्थ्यांना सुचित करण्यात येते की दिनांक १४ फेब्रुवारी रोजी बीड येथे भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी जास्तीत जास्त संख्येने सर्व आस्थापनातील सदस्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण संघटना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना काम करणाऱ्या सर्व आस्थापनातील सदस्यांना सरकारने पुढील कार्यकाल वाढवून द्यावा, वेळेवर विद्यावेतन देण्यात यावे या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांच्या संदर्भात बीड येथे मुक मोर्चाचे आयोजन दिनांक १४ फेब्रुवारी रोजी करण्यात आलेले आहे.या मोर्चास छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( जिल्हा परिषद समोर ) बीड या ठिकाणी ठिक ११ वाजता

पान ३ वर

# आ.सुरेश धसांच्या विरोधात षडयंत्र रचणाऱ्याच्या विरोधात आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते आक्रमक

## अफवा पसरविणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करा-जावळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

स्व.अड. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या प्रकरणी आ. सुरेश (आण्णा) धस यांनी केलेल्या वक्तव्याची चुकीची अफवा पसरविणाऱ्या व षडयंत्र रचणाऱ्याच्या विरोधात पाटोदा येथील आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते आक्रमक झाल्याच्या दिसून आले. पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर करत कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



अड.सोमनाथ सुर्यवंशी यांच्या समर्थनार्थ परभणी ते मुंबई येथे निघालेल्या लॉगमार्च मोर्चाला सांत्वन भेट देण्यास गेलेल्या आ.सुरेश धस यांच्या भाषणातील व्हिडिओ ची तोडफोड करून महाराष्ट्रातील

पान ३ वर

# आष्टीतील १२ परीक्षा केंद्रावर बारावीची कॉफीमुक्त परीक्षा सुरू-गटशिक्षणाधिकारी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बारा परीक्षा केंद्रावर बारावी बोर्ड परीक्षा कॉफी मुक्त मुक्त सुरु आहे . आष्टी येथील जि.प. कन्या शाळा व कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयात परीक्षाचे पेपर ठेवले आहेत. आष्टी अंतर्गत पाच केंद्रावर २ हजार ८० परीक्षार्थी तर कडा येथील केंद्राअंतर्गत सात परीक्षा केंद्रात २ हजार ७८९ परीक्षार्थी परीक्षा देणार असल्याची माहिती गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव यांनी दिली. कला वाणिज्य महाविद्यालय आष्टी, पं. जवाहरलाल नेहरु कनिष्ठ महाविद्यालय आष्टी, भगवान कनिष्ठ महाविद्यालय आष्टी,निवृतीराव धस कनिष्ठ महाविद्यालय जामगाव, शाहू महाराज कनिष्ठ महाविद्यालय डोईठाण ही पाच परीक्षा केंद्र आष्टी कस्टटीयन अंतर्गत आहेत. कडा कस्टडीन अंतर्गत मोतीलाल कोठरी कनिष्ठ महाविद्यालय कडा, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय कडा, आनंदराव धोंडे कनिष्ठ महाविद्यालय कडा, जनता कनिष्ठ महाविद्यालय धानोरा, कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय धानोरा, महेश कनिष्ठ महाविद्यालय रुईनालकोल आणि ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालय देऊळगाव घाट या सात परीक्षा केंद्रात परीक्षा सुरु होत आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने माघ पौर्णीमा उत्साहात साजरी



**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतिन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे सातत्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ गतीमान करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात याचा एक भाग म्हणुन दि.१२ फेब्रुवारी बुधवार रोजी माघ पौर्णीमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,हे होते तर भारतीय बौद्ध महासभेचे माजी उपाध्यक्षा लिलाताई उजगरे व शारदाताई तांगडे यांनी भगवान बुद्धाच्या जिवनातील माघ पौर्णीमेचे महत्व या विषयी सविस्तर आसे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन सचिव एन बी राजभोज,माजी संरक्षण उपाध्यक्ष,गुलाब प्रधान,माजी शहर अध्यक्षा मायाताई स्वामी,हे उपस्तीत होते,तसेच या ठिकाणी रमाई जयंती निमित्त माता रमाई व बाबासाहेबांचा संवाद आसणारी एकांकिका माता रमाईच्या वेशभुषेतून सादर केली,त्या शारदाताई टाकणखार,यांचा विषेश सत्कार भारतीय बौद्ध महासभा माजलगावच्या

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# माजी आ.दरेकर यांना जीवन गौरव तर प्रा.डॉ. बोडखे शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार प्रदान

आष्टी । प्रतिनिधी

शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आष्टीचे माजी आमदार,जेष्ठ नेते साहेबराव दरेकर (नाना) यांना शब्दगंध जीवन गौरव तर कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डा.जी.पी.बोडखे यांना शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शब्दगंध साहित्य संमेलनामध्ये हा मानाचा पुरस्कार पद्मश्री पोपटराव पवार,आ.संग्राम जगताप,शब्दगंध साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षा,जेष्ठ साहित्यिका प्रा.डा. श्रीमती संजीवनी तडेगावकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी देवीदास धस, शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजेंद्र उदागे,कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, सचिव सुनील गोसावी,अभिषेक कळमकर आदि मान्यवर उपस्थित होते.शब्दगंध साहित्यिक परिषद आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्यावतीने १६ वे.राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य




संमेलन अहिल्यानगर येथे ज्येष्ठ साहित्यिका, संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. श्रीमती संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.८ आणि ९ फेब्रुवारी रोजी पार पडले.

शब्दगंधच्यावतीने नवोदित लेखक, कवींना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी वर्षभर विविध साहित्यिक उपक्रम राबवण्यात येतात.त्यामध्ये कथाकथन, काव्यवाचन, परिसंवाद,चर्चासत्र, कथा,काव्यलेखन स्पर्धा,विविध पुरस्कार वितरण, पुस्तक प्रकाशन, बालसंस्कार शिबिर असे विविध उपक्रम राबवण्यात येतात. दरवर्षी राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. त्यामध्ये एका ज्येष्ठ साहित्यिक आणि एका सामाजिक कार्यकर्त्याच्या कार्याची दखल घेऊन त्यांना शब्दगंध जीवन गौरव आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुरस्कार देण्यात येतो.यावर्षीचा शब्दगंध जीवन गौरव पुरस्कार सन २०२५ या पुरस्कारासाठी आष्टीचे माजी आमदार,ज्येष्ठ नेते साहेबराव दरेकर (नाना) यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता.रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर येथील कोहिनूर मंगल कार्यालयात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला.

प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित..

शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.गोपीनाथ बोडखे यांना शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार - २०२५ ने सन्मानित करण्यात आले.प्रत्येक वर्षी राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. त्यामध्ये शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल शब्दगंध शैक्षणिक कार्यगौरव पुरस्कार देण्यात येतो.या वर्षीच्या पुरस्कारासाठी कड्याचे प्रा. डॉ.गोपीनाथ बोडखे यांना जाहीर झाला होता.रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, सुनिल गोसावी, अध्यक्ष राजेंद्र गोसावी,कार्याध्यक्ष पाडुळे,सहसचिव प्रा.डॉ.अनिल गर्जे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,डॉ.राम बोडखे,उपप्राचार्य डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.डा.बाळासाहेब धोंडे,चव्हाण, उपप्राचार्य डॉ. संभाजी वाघुले, उपप्राचार्य डॉ.बापु खैरे,प्रा.आर.जी.


विधाते,सेवानिवृत पीएस आय शेख अन्सारभाई, चेअरमन बबन नन्नवरे,माऊली बोडखे,

मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, इजि.पी.बी.बोडखे, डॉ.एम.आर.पटेल, डॉ.शाम सांगळे,प्रा. अविनाश भवर,डॉ. भीमराज गावडे,डॉ. सज्जन गायकवाड आदि मान्यवर उपस्थित केले.

# पुण्यातील गोळीबार प्रकरणाला नवं वळण; चुलत भावानेच रचला कट, दिली हत्येची सुपारी

पुणे : जिल्ह्यातील नावाजलेली एमआयडीसी असलेल्या चाकण एमआयडीसी परिसरात दिवसाढवळ्या एका उद्योजकावर गोळीबार केल्याची घटना घडली होती. २० जानेवारी रोजी येथील स्टील कंपनीच्या मालकावरच गोळ्या झाडल्याने परिसरात खळबळ उडाली होती. आता, याप्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली असून चक्क चुलत भावानेच, ज्याला अजयसिंह आदर्श मानत होता त्या संग्रामसिंगनेच अजयच्या हत्येची सुपारी दिल्याचे पोलिस तपासातून पुढे आलं आहे. विशेष म्हणजे १२ लाख रुपयांत भावाला ठार मारण्याची सुपारी देण्यात आली होती. याप्रकरणी, पोलिसांनी ४ जणांना अटक केली असून नुकतेच एकास उत्तर प्रदेशातून ताब्यात घेण्यात आले. त्यानंतरच, भावानेच सुपारी दिल्याचं गुढ उघडकीस आली आहे.

चाकण औद्योगिक वसाहतीत २० दिवसांपूर्वी घडलेल्या गोळीबाराच्या घटनेत स्मॉल स्केल इंडस्ट्रीजमधील कैलास स्टीलचे मालक अजय सिंग यांच्यावर हा गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यात अजय सिंग यांच्या पोटात एक गोळी तर दुसरी गोळी पाठीत लागलेली होती. दोन अज्ञात दुचाकीवर आले अन् त्यांनी कंपनीच्या गेटवरुनच कंपनीच्या मालकांवर हा हल्ला केला. त्यानंतर



हल्लेखोर घटनास्थळावरुन पसार झाले होते. आता, याप्रकरणी पोलीस गोळीबाराच्या घटनेच्या मुळाशी पोहोचले असून उद्योजक अजय सिंग यांच्या चुलत भावानेच भावाची सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

जिल्ह्यातील चाकण एमआयडीसीमध्ये झालेल्या गोळीबाराने वेगळं वळण घेतल्याचं पाहायला मिळत आहे. चुलत भावाने भावाची सुपारी दिल्याची धक्कादायक माहिती समोर पोलीस तपासातून पुढे आली आहे. कौटुंबिक वाद आणि व्यावसायीक ईर्षेतून त्याने ही सुपारी दिली होती. संग्रामसिंग असं सुपारी देणाऱ्या चुलत भावाचे नाव असून त्याने अजय सिंगची हत्या करण्यासाठी चौघांना सुपारी दिली होती. हत्येच्या उद्देशाने कैलास स्टील कंपनीच्या प्रवेशद्वारावर अजय सिंगवर गोळीबार झाला होता, अजय त्या कंपनीत मॅनेजर म्हणून काम करतो. याप्रकरणी गोळीबार करणाऱ्या दोघांपैकी रोहित पांडेला पोलिसांनी उत्तर प्रदेशातून अटक केल्यावर आता नवी माहिती समोर आली आहे. याप्रकरणात चक्क चुलत भावाचे बिंग फुटले. अजय आधी संग्रामकडे कामाला होता, अजयला या स्टील क्षेत्रात संग्रामनेचं आणलं होतं. मात्र, अजय मोठा होऊ लागला, हे संग्रामला पचत नव्हतं. त्यातून संग्रामने अजयची सुपारी दिली अन् सगळा प्रकार घडला. या दरम्यानच्या काळात चुलत भाऊ जखमी भावाला पाहण्यासाठी हॉस्पिटलमध्येही आला होता. पिंपरी चिंचवड पोलीस काय-काय तपास करतायेत, याचीही माहिती तो घेत असे. मात्र, अखेर पोलीस तपासात त्यानेच सुपारी दिल्याचं उघडकीस झाल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. दरम्यान, हे ऐकून अजयला मात्र विश्वास बसेना. मी ज्याला आदर्श मानत होतो, तोच माझ्या जीवावर उठला. हे उघडकीस आल्यावर अजयला मोठा धक्का बसला आहे.

# राजेवाडीतून देव निघाले लग्नाला; श्रीनाथ म्हस्कोबाच्या पालखीचे वीरकडे प्रस्थान

वाघापूर । प्रतिनिधी

नाथ साहेबाचे चांगभले सवाई सर्जाच चांगभले असा जयघोष करत राजेवाडी



तालुका पुरंदर येथील श्रीनाथ म्हस्कोबाची पालखी वीरकडे रवाना झाली.

राजेवाडी येथे श्रीनाथ म्हस्कोबा देवाचा साखरपुडा तसेच हळदीचा कार्यक्रम झाला. यानंतर मंगळवारी (दि. ११) श्रीनाथ म्हस्कोबाची पालखी देवाला घेऊन वीरकडे पारगाव मेमाणे, वाळुंज, शिवरी, शिंदेवाडी घाट, परिंचे नवलेवाडी, राऊतवाडी व शेवटी वीर गाव असा पायीप्रवास करून वीर येथे दाखल झाली. यात्रा काळामध्ये वीर येथे यात्रेचे स्वरूप आलेलं असतं या कालावधीमध्ये गावातील शेकडो भाविक महिला वीर येथे लग्न सोहळ्यासाठी आपापल्या बैलगाडी असेल तसेच विविध वाहनांमधून वीर येथे मुक्कामी असतात. या कालावधीमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते अशी माहिती राजेवाडी येथील श्रीनाथ म्हस्कोबा पालखी सोहळ्याचे प्रमुख रामदास दशरथ बधे तसेच हनुमंत बधे यांनी दिली.

# खेड बाजार समितीचे संचालक सयाजी मोहिते यांचा हमाल परवाना रद्द

खेड: खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक सयाजी माणिक मोहिते यांनी सन २०२४-२५ मध्ये झालेल्या संस्थेच्या निवडणुकीत नुतनीकरण करून सादर केलेला हमाल परवाना रद्द करण्यात आला आहे.खेड तालुका सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक सचिन सरसमकर यांनी सोमवारी (दि १०) हा आदेश दिला आहे.




बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांच्या सत्ताधारी गटात सयाजी मोहिते सहभागी झाले आहेत.पुर्वी ते माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या माध्यमातून समितीत कार्यरत होते.

यापुर्वीही आमचे एक संचालक अशोक राक्षे यांना अशाच प्रकारे 'टार्गेट' करण्यात होते. मोहिते यांचा परवाना रद्द झाल्याने त्यांचे संचालक पद अथवा बाजार समितीच्या राजकिय घडामोडींवर कोणताही परीणाम होणार नसल्याचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, संचालक माणिक गोरे यांनी सांगितले.

खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक सयाजी मोहिते हे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या गावातील असुन त्यांच्याच पॅनल मधुन दोनदा निवडणुक लढवून निवडून आले आहेत. सयाजी मोहिते यांच्या परवाना दाखल्यावर बापु बाळु थिगळे यांनी आक्षेप घेतला होता. त्याची पडताळणी करण्यात आली. संचालक सयाजी मोहिते यांनी मागील निवडणुकी दरम्यान दाखला नुतनीकरण केला. मात्र त्यासाठी किती काम केले आणि किती मोबदला मिळवला याबाबत माहिती दिली नसल्याचे निदर्शास आले. विपर्यास करून दाखला मिळवला असा ठपका ठेवत श्री सरमरकर यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील नियम ७(३) मधील नमुद अटींचा भंग केला आहे. असा निष्कर्ष नोंदवून मोहिते यांचा दाखला रद्द ठरवण्यात आला आहे. यावर न्यायालयात दाद मागितली जाईल असे सयाजी मोहिते यांनी सांगितले.

# पिंपरी हादरली! दोघांवर ब्लेडने सपासप वार; धक्कादायक कारणही आलं समोर

पिंपरी । प्रतिनिधी

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पिंपरीमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. तीन मित्र अंडाभुर्जी खाण्यासाठी गेले. तिथे एक तरुण सिगारेट ओढत होता. बाजूला जाऊन सिगारेट ओढ, असे त्याला सांगितल्याने त्याने ब्लेडने दोघांवर वार करत खून करण्याचा प्रयत्न केला आहे. ही घटना शुक्रवारी (दि. ७) रात्री साडेनऊच्या सुमारास कुदळवाडी, चिखली येथे घडली आहे. पोलिसांनी संशयिताला अटक केली आहे.




जफर अहमद शोहराबअली शाह (२८, रा. कुदळवाडी, चिखली) असे अटक केलेल्याचे नाव आहे. गणेश शिंदे (२४, रा. चिखली) यांनी याप्रकरणी शनिवारी (दि. ८) चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुष्कर नेवाळे, उदय ताले अशी जखमींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश शिंदे आणि त्यांचे मित्र पुष्कर व उदय हे शुक्रवारी रात्री कुदळवाडी येथे अंडाभुर्जी खाण्यासाठी गेले होते. अंडाभुर्जी खात असताना तिथेच जफर हा सिगारेट ओढत होता. त्याला 'बाजूला जाऊन सिगारेट ओढ', असे गणेश यांनी सांगितले. त्या कारणावरून जफर याने गणेश आणि त्यांच्या मित्रांसोबत वाद घातला. पुष्कर आणि उदय यांच्यावर ब्लेडने वार करत खून करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले. पोलिस उपनिरीक्षक राजेश मासाळ अधिक तपास करीत आहेत.

# साधू वासवानी पुलाला अडथळा ठरणाऱ्या झोपड्या हटविल्या

पुणे । प्रतिनिधी

कोरेगाव पार्क आणि व्हीआयपी विश्रामगृह या भागाला जोडण्यासाठी महत्त्वाचा असणाऱ्या साधू वासवानी रेल्वे पुलाच्या बांधकामाचा मोठा अडसर महापालिकेला दूर करण्यात यश आले आहे. व्हीआयपी विश्रामगृहाच्या बाजूने असलेल्या १०० पेक्षा जास्त झोपड्या हटविण्याचे काम महापालिकेने सुरु केले आहे. त्यामुळे उर्वरित जुना पूल पाडून नवीन पूल बांधण्याच्या कामाला गती येणार आहे.

साधू वासवानी पूल बांधून ५० पेक्षा जास्त वर्ष उलटून गेल्याने हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाला होता. त्यामुळे हा रेल्वेमार्गावरील पूल पाडून नवा पूल बांधण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. त्यासाठी ८३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.



पण हा पूल नगर रस्ता, हडपसर, पुणे स्टेशन, स्वारगेट या भागात ये जा करण्यासाठी सोईचा होता, त्यावरून रोज हजारो वाहनांची वाहतूक होत होती. हा पूल पाडल्याने परिसरातील नागरिकांना व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागणार होता. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी पर्यायी व्यवस्था केल्यानंतर याठिकाणी काम सुरु झाले आहे.

महापालिकेने या रेल्वे मार्गावरील पुलाचा काही भाग आधी पाडला. या पुलालगत अनेक झोपड्या होत्या. त्यांना तेथून काढल्यानंतर संपूर्ण पूल पाडता येणार होता. गेल्या काही महिन्यापासून झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न होते. त्यास काही जणांनी विरोध केला होता.

अखेर या नागरिकांची समजूत काढल्यानंतर महापालिकेचे त्यांचे हडपसर येथे पुनर्वसन केले आणि आता झोपड्या काढून घेण्यास सुरुवात केली आहे. आत्तापर्यंत ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. उद्या सर्व झोपड्या हटविल्या जातील असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

# बैलगाडेभांबोली येथील भैरवनाथ यात्रेत धावले ५०० बैलगाडे

आंबेठाण, ता. १२ : भांबोली (ता. खेड) येथे भैरवनाथ महाराजांच्या यात्रेत खेड तालुक्यासह पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील जवळपास ५०० बैलगाडे सहभागी झाले होते. येथील हिंदकेसरी घाटात ही शर्यत चार दिवस पार पडली.



सतत तीन वर्षे प्रथम येणाऱ्या बैलगाड्यास एक ट्रॅक्टर बक्षीस देण्यात आला. तर फायनलमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या बैलगाड्यास एक ट्रॅक्टर आणि दुसऱ्या क्रमांकास एक ट्रॅक्टर बक्षिस ठेवण्यात आले होते. याशिवाय तिसऱ्या क्रमांकासाठी दोन बुलेट बक्षिस ठेवण्यात आल्या होत्या. तर चौथ्या क्रमांकासाठी दोन दुचाकी आणि पाचव्या, सहाव्या आणि सातव्या क्रमांकासाठी प्रत्येकी एक दुचाकी, तसेच आठव्या क्रमांकासाठी एक फ्रिज, नवव्या क्रमांकासाठी एक एलसीडी आणि दहाव्या क्रमांकासाठी सायकल बक्षिस ठेवण्यात आली होती.

# शिरूर येथे शनिवारपासून धनराज नहार व्याख्यानमाला

शिरूर । प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त येत्या १५ फेब्रुवारीपासून येथे स्व. धनराज नहार स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. व्याख्यानमालेचे हे २८ वर्ष असून, या व्याख्यानमालेत विविध मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत.

माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या 'न्यायव्यवस्था : सद्यःस्थिती आणि आव्हाने' या विषयावरील व्याख्यानाने शनिवारी (ता. १५) या व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार असून, रविवारी (ता. १६) 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनितीचा भारतीय राजकारणावर झालेला परिणाम' या विषयावरील व्याख्यानाने ज्येष्ठ पत्रकार व इतिहास संशोधक अशोककुमार पांडेय हे या व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफणार आहेत. राज्याचे निवृत्त सचिव महेश झगडे सोमवारी (ता. १७) 'लोकप्रतिनिधी आणि नोकरशाही : संविधानिक जबाबदाऱ्या आणि वास्तव' या विषयावर बोलणार असून, मंगळवारी (ता. १८) प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. अजित आपटे यांचे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन शास्त्र' या विषयावर व्याख्यान होणार आहे. प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले हे या व्याख्यानमालेच्या समारोपात बुधवारी (ता. १९) 'माझा लेखन प्रवास' या विषयाच्या मांडणीतून आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि एकूण लेखनविषयांबद्दल मुक्त संवाद साधणार आहेत.

येथील साई गार्डन मंगल कार्यालयात दररोज सायंकाळी सात वाजता ही व्याख्याने सुरू होतील, अशी माहिती रवींद्र धनक यांनी दिली. शिवजयंतीदिनी (ता. १९) सकाळी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस प्रकाश धारिवाल, प्रशांत ढोले, बाळासाहेब म्हस्के, संदेश केंजळे, प्रीतम पाटील यांच्या उपस्थितीत अभिवादन सोहळा होणार असल्याची माहिती समितीचे संघटक ड. ओमप्रकाश सतिजा यांनी दिली.

# आर्यन बेडेकर खून प्रकरणातील संशयितांची तळेगाव परिसरात धिंड

तळेगाव स्टेशन; पुढारी वृत्तसेवा: आर्यन बेडेकरच्या खूनातील संशयित आरोपींची वराळे परिसर, सरस्वती विद्यामंदिर, तळेगाव स्टेशन भागात तळेगाव दाभाडे पोलिसांनी धिंड काढली. आर्यन बेडेकर याचा शुक्रवारी (दि.३१) धारदार शस्त्राने निर्घृण खून करण्यात आला होता. खूनातील संशयित आरोपींना अटक केली असून ते गुन्ह्याच्या ठिकाणी कोणत्या मार्गाने आले, गुन्हा केल्यानंतर कोठे पळून गेले. तसेच सीसीटीव्ही फुटेज नुसार पुरावे गोळा करण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दरम्यान, आरोपींना जरब बसावी, कायद्याचा धाक बसावा, गुन्हेगारी आटोक्यात यावी आणि नागरिकांमधील भीतीचे वातावरण निवळावे, या हेतूने संशयितांची धिंड काढण्यात आली, अशी माहिती तळेगाव दाभाडे पोलिस स्टेशनच्या सूत्रांनी दिली.



# जीबीएसचे नवीन पाच रुग्ण

पुणे : गुलेन बॅरे सिंड्रोमचे (जीबीएस) नव्याने पाच रुग्ण सापडले असून, बाधित रुग्णसंख्या १९७ वर पोहोचली आहे. त्यात आज दिवसभरात १३ रुग्ण बरे होऊन घरी गेले असून, आतापर्यंत १०४ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. २२ रुग्ण व्हेंटिलेटरवर असून, ५० रुग्णांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

महिन्याभरापासून शहरासह जिल्ह्यातील काही भागांत जीबीएस आजाराने आरोग्य विभागाची झोप उडवली आहे. आजही दररोज चार ते पाच बाधित सापडत असून, व्हेंटिलेटर आणि अतिदक्षता विभागात उपचार घेणाऱ्यांची संख्याही दररोज कमी-



अधिक होत आहे. दरम्यान, पुणे शहरासह पिंपरी- चिंचवड आणि ग्रामीण भागातही रुग्ण आढळत आहे. आतापर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यात १९७ संशयित जीबीएसबाधित रुग्णांपैकी १७२ रुग्णांना जीबीएस झाल्याचे निदान निश्चित झाले आहे. त्यामध्ये सात रुग्णांचा मृत्यू झाला आहे. बाधितांमध्ये ४० रुग्ण पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील असून, सर्वाधिक रुग्णसंख्या ९२ ही समाविष्ट गावांतील आहे. २९ रुग्ण पिंपरी- चिंचवड महापालिका, २८ रुग्ण पुणे ग्रामीण, तर ८ रुग्ण इतर जिल्ह्यांतील आहेत.

# आंबेगाव पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष वळसे पाटील

महाळुंगे पडवळ : आंबेगाव तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष वळसे पाटील आणि उपाध्यक्षपदी नीलेश कान्नव यांची बिनविरोध फेरनिवड केली.

कळंब (ता. आंबेगाव) येथे पत्रकार संघाची बैठक झाली. मागील वर्षाच्या कार्यकारणीची फेरनिवड केली. कार्यकारणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष-संतोष वळसे पाटील, उपाध्यक्ष-नीलेश कान्नव, सचिव चंद्रकांत घोडेकर, सहसचिव विवेक शिंदे, खजिनदार अरुण सरोदे, मंचर पत्रकार प्रमुख जयेश शहा, पत्रकार परिषद घोडेगाव प्रमुख विकास गाडे, निरीक्षक सुदाम बिडकर, भरत चिखले, कार्यकारिणी सदस्य अरुण गोरडे, विशाल करंडे, लक्ष्मण ढोबळे, रवींद्र वाळके, सल्लागार डी. के. वळसे पाटील, कुमार होनराव.



या वेळी पत्रकार अशोक शेंगाळे यांनी स्वतःची ७० गुंठे जागा शासनाला दिल्याबद्दल तसेच शेतमाल प्रक्रिया संस्थेच्या संचालकपदी पत्रकार भरत चिखले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. या वेळी डी. के. वळसे पाटील यांनी मार्गदर्शन केले. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील लोणकर यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.